दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ शनिवार, दि.१ फेब्रुवारी २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १२२ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

आरोपीचा न्यायालातून पळून जाण्याचा प्रयत्न, गुन्हा दाखल

मुंबई : पोक्सो गुन्ह्यांतील आरोपीने कुलाब्यातील सत्र न्यायालयातून पळून जाण्याचा प्रयत्न केला. आरोपीला तात्काळ ताब्यात घेण्यात आले असून याप्रकरणी कुलाबा पोलिसांकडे तक्रार करण्यात आली आहे. पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून आरोपीला सध्या आर्थर रोड कारागृहात ठेवण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. कुलाबा येथे कोर्ट रूम ३३ येथे आरोपीला बुधवारी आणण्यात आले होते. सुनावणी झाल्यानंतर कोर्टरूम बाहेरील मोकळ्या जागेत उभा असताना आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्याचा ताब्यात घेण्यात आले. आरोपीला सध्या आर्थररोड कारागृहात ठेवण्यात आले आहे. महिला पोलीस शिपायाच्या तक्रारीवरून याप्रकरणी कुलाबा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २६२ अंतर्गत अटकेला प्रतिकार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीविरोधात २०२३ मध्ये विनयभंग व पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल होता. त्याच्या सुनावणीसाठी त्याला न्यायालयात आणण्यात आले होते. त्यावेळी त्याने पळून जाण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी कुलाबा पोलिसांनी गुरूवारी गुन्हा दाखल केला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्याची सफारी सुरु होणार: मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड. आशिष शेलार

वृत्तसंस्था ■ मुंबई

'भारत, भारती'ला पालकमंत्र्यांनी घेतले दत्तक!

मुंबई : बोरिवलीच्या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात बिबट्याची सफारी सुरु होणार असून आज राज्याचे माहिती तंत्रज्ञान तथा सांस्कृतिक कार्य मंत्री आणि मुंबई उपनगर पालकमंत्री ?ड.आशिष शेलार यांनी याबाबत घोषणा केली. तसेच या उद्यानातील दोन सिंह वर्षभरासाठी त्यांनी दत्तक घेतले आहेत.

मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड.शेलार यांनी आज बोरिवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा पाहणी दौरा केला. यावेळी उपनगराचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, मुख्य वनरक्षक श्रीजी मल्लिकार्जुन, उपसंचालक रेवती कुलकर्णी, सहाय्यक वनरक्षक सुधीर सोनवणे, मुख्य सुरक्षा अधिकारी योगेश महाजन आणि संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये सध्या वाघ आणि सिंहाच्या दोन सफारी उपलब्ध आहेत. महाराष्ट्राच्या विविध भागात बिबट्यांचे सापडलेले बछडे याच उद्यानात संरक्षित करण्यात आलेले आहेत. त्यांचे पालन करण्यात येत आहे. मात्र पर्यटकांना पाहण्यासाठी त्यांची सफारी उपलब्ध नाही. त्यासाठी सुमारे तीस हेक्टर जागा लागणार असून ही जागा या क्षेत्रात उपलब्ध आहे. तर सफारीसाठी प्रकल्प उभारण्यासाठी सुमारे ५ कोटी खर्च अपेक्षित आहे, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या राष्ट्रीय उद्यानाला वर्षभरात २० लाख पर्यटक भेट देतात. जर बिबट्याची सफारी उपलब्ध झाली तर पर्यटकांची संख्या वाढेल व त्यातून वनक्षेत्राचे उत्पन्न वाढेल, अशी माहिती देऊन मुख्य वनरक्षक श्रीजी मल्लिकार्जुन यांनी मंत्री ॲड.शेलार यांच्यासमोर सादरीकरण केले.

दरम्यान, याबाबत आढावा घेतल्यानंतर मंत्री आशिष शेलार यांनी या क्षेत्रात नवी बिबट्याची सफारी सुरू करा, त्यासाठी लागणारा निधी वन खात्याकडून आणि जिल्हा नियोजन समितीमधून आम्ही देऊ, असे त्यांनी सांगितले. याबाबत तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.



लवकरच बिबट्या सफारी सुरु होणार

'भारत, भारती'ला पालकमंत्र्यांनी घेतले दत्तक!

या उद्यानात 'भारत आणि भारती' हे तीन वर्षाचे दोन सिंह नुकतेच २६ जानेवारीला गुजरात मधून आणण्यात आले आहेत. त्यांना वर्षभरासाठी मंत्री ?ड.शेलार यांनी दत्तक घेतले असून त्यांच्या पालनपोषणासाठी होणारा खर्च मंत्री ॲड.शेलार वैयक्तिकरित्या करणार आहेत.

४११ जणांना सुरक्षा कवच

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात ४०० वन मजूर असून ते उन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता तसेच वन्य प्राण्यांचा अधिवास असलेल्या क्षेत्रात स्वतःचा जीव धोक्यात घालून सतत गस्तीचे काम करतात. यातील बहूसंख्य हे आदिवासी बांधव आहेत.

तर मानवी वस्तीमध्ये वन्य प्राणी घुसल्यानंतर त्यांना पकडण्यासाठी जाणारी ११ जणांची टीम असून या सगळ्यांचा प्राण्यांशी थेट संपर्क येतो. मात्र या सगळ्यांचा सुरक्षा विमा उतरवण्यात आलेला नाही, ही बाब मंत्री ?ड.शेलार यांच्या निदर्शनास आली. त्यामुळे त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने याबाबत निर्देश दिले व या सगळ्यांचा सुरक्षा विमा उतरवण्यास सांगितले. त्यासाठी लागणारा निधी उपलब्ध करुन देऊ अशी ग्वाही ही त्यांनी दिली.

गुन्हे शाखेकडून २५ लाखांचे अमली पदार्थ जप्त; मेफेड्रोन, गांजा विक्री प्रकरणात तिघे अटकेत

वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाकडून वेगवेगळ्या भागात कारवाई करुन २५ लाख ५१ हजार रुपये किंमतीचे अमली पदार्थ जप्त केले. त्यामध्ये मॅफेड्रॉन आणि गांजाचा समावेश आहे. याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याविरुद्ध मार्केट यार्ड आणि विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी अमली पदार्थ मुक्त पुणे ही मोहीम हाती घेतली आहे. पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार शहरातील अमली पदार्थ तस्करांविरुद्ध कारवाई करण्यात येत आहे. अमली पदार्थ विरोधी पथकातील पोलीस निरीक्षक सुदर्शन गायकवाड आणि पथक विमाननगर परिसरात गस्त घालत होते. लोहगाव-वाघोली रस्त्यावर एक जण थांबला असून, तो मेफेड्रोन विक्री करण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी सापळा लावून कुमेल महंमद तांबोळी (वय २८, रा. धानोरी) याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेण्यात आली. त्याच्याकडून १९ लाख १७ हजार ३०० रुपयांचे ८३ ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले. त्याच्याविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मार्केट यार्डात भागात गांजा विक्री प्रकरणात सैफन उर्फ शफिक इस्माइल शेख (वय ५२, रा. आनंदनगर) याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून सात हजार रुपयांचा गांजा जप्त करण्यात आला. सैफन गांजा विक्री करण्याच्या तयारीत असल्याची माहिती पोलीस कर्मचारी अजीम शेख यांना मिळाली होती. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. विमाननगर भागात मेफेड्रोन विक्री प्रकरणात किरण भाऊसाहेब तुजारे (वय २४, रा. आव्हाळवाडी, वाघोली) याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून सहा लाख २७ हजार रुपयांचे ३० ग्रॅम मेफेड्रोन जप्त करण्यात आले. तुजारे मेफेड्रोन विक्री करत असल्याची माहिती पोलीस कर्मचारी संदीप शिर्के यांना मिळाली होती. त्यानंतर कारवाई करुन त्याला ताब्यात घेण्यात आले. पोलीस उपायुक्त निखील पिंगळे, सहायक आयुक्त गणेश इंगळे, सहायक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक उल्हास कदम, सुदर्शन गायकवाड, सहायक निरीक्षक अनिकेत पोटे, उपनिरीक्षक दिगंबर कोकाटे, पोलीस कर्मचारी साहिल शेख, रवींद्र रोकडे, संदीप जाधव, मयूर सूर्यवंशी, आझाद पाटील, योगेश मांढरे, विनायक साळवे, दत्ताराम जाधव, विशाल दळवी यांनी ही कामगिरी केली.

चांदीच्या अंगठ्यांना सोन्याचा मुलामा, सराफाची फसवणूक करणारी टोळी गजाआड

वृत्तसंस्था ■ पुणे



पुणे : चांदीच्या अंगठ्यांना सोन्याचा मुलामा लावून त्या गहाण ठेवणाऱ्या चौघांना चंदननगर पोलिसांनी अटक केली. आरोपींनी वडगाव शेरी भागातील एका सराफ व्यावसायिकाची फसवणूक केली होती. त्यांच्याकडून सोन्याच्या मुलामा दिलेल्या चार अंगठ्या जप्त करण्यात आल्या आहेत. ओमप्रकाश शामसुंदर परदेशी (वय ५८, रा. वडगावशेरी), फय्याज चांद सय्यद (वय ३५, रा. वडगाव शेरी), आरिफ खलील शेख (४१, रा. येरवडा), शरण माणिकराव शिलवंत (४६, रा. धनकवडी) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत एका सराफ व्यावसायिकाने फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, तक्रारदार सराफ व्यावसायिकाचे वडगाव शेरी भागात सराफी पेढी आहे. काही दिवसांपुर्वी रिक्षांमधून दोघे जण त्यांच्याकडे आले. त्यांनी सोन्याच्या अंगठ्या असल्याचे भासवून चार अंगठ्या गहाण ठेवून त्याबदल्यात एक लाख रुपये घेतले. या अंगठ्या बनावट असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली तांत्रिक तपास करुनआरोपी परदेशीला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत परदेशीच्या साथीदारांची नावे निष्पन्न झाले. आरोपी शेख हा शिलवंत याच्याकडून या बनावट अंगठ्या घेत होता. परदेशी आणि सय्यद या अंगठ्या सराफ व्यावसायिकांकडे गहाण ठेवून फसवणूक करत होते. आरोपींनी अशा पद्धतीने शहरातील आणखी काही सराफ व्यावसायिकांची फसवणूक केल्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव, सहायक आयुक्त प्रांजली सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सीमा ढाकणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक दत्तात्रय लिगाडे, दत्तप्रसाद शेडगे आणि तपास पथकाने ही कामगिरी केली.

अशोक धोडी यांचे अपहरण करून हत्या ; वाहनासह मृतदेह बंद दगड खदानीत

वृत्तसंस्था ■ डहाणू



डहाणू : तलासरी तालुक्यातील वेवजी येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक धोडी यांचे अपहरण करून हत्या केल्याचा प्रकार शुक्रवार ३१ जानेवारी रोजी उघडकीस आला आहे. अशोक धोडी बेपत्ता झाल्यानंतर तब्बल १२ दिवसांनी त्यांचा तपास लागला असून गुजरात मधील भिलाड नजीकच्या सरिगाम येथील एका बंद दगड खडणीत त्यांच्या वाहनासह मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली आहे. त्यांचे भाऊ अविनाश धोडी पोलिसांच्या ताब्यातून फरार झाल्यामुळे त्यांच्यातील वयक्तिक वादातून (पूर्ववैमनस्यातून) अशोक धोडी यांची हत्या झाल्याचा संशय व्यक्त होत आहे.

तलासरी तालुक्यातील शिवसेनेचे पदाधिकारी अशोक धोडी २० जानेवारी रोजी मुंबईला कमनिमित्त गेले होते. तिथून परतत असताना त्यांनी घरी फोन करून जेवायला येतो असे सांगितले. त्यांनतर घोलवड वरून त्यांच्या घरी वेवजी येथे परतत असताना त्यांच्या वाहनासह त्यांचे अपहरण करण्यात आले. या प्रकरणी कुटुंबीयांनी घोलवड पोलीस ठाण्यात धाव घेत ते बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली. अनेक दिवस उलटून देखील अशोक धोडी यांचा तपास लागत नसल्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांनी संशयितांच्या नावे गुन्हा दाखल करण्याची मागणी केल्यानंतर संशयित अविनाश धोडी (वेवजी - तलासरी) मनोज राजपूत (सरीगाम - गुजरात) आणि सुनील धोडी (जामशेत - डहाणू) या तीन जणाविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तीनही संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेत तपास सुरू केल्यानंतर यातील अविनाश धोडी आणि अन्य एक आरोपी पोलिसांच्या ताब्यातून फरार झाल्याचे समोर आले होते. यामुळे अशोक धोडी यांचा घातपात झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत होता. अखेर अटक संशयितांनी दिलेल्या माहितीनुसार तपासात तब्बल १२ दिवसांनंतर अशोक धोडी यांचा पत्ता लागला असून त्यांच्या मृहदेह गुजरात मधील सरिगाम येथे त्यांच्या वाहनामध्ये मागच्या बाजूला त्यांचा दोरीने बांधलेल्या अवस्थेत आढळून आला आहे. या प्रकरणामुळे परिसरात खळबळ माजली असून अशोक धोडी यांच्या कुटुंबियांकडून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

सिंहगड रस्ता भागात दुचाकी चोरट्यांना पकडले, पाच दुचाकींसह लॅपटॉप जप्त

वृत्तसंस्था ■ पुणे



पुणे : सिंहगड रस्ता भागातून दुचाकी चोरणाऱ्या दोन चोरट्यांना पोलिसांनी पकडले. पोलिसांनी चोरट्यांकडून पाच दुचाकी आणि एक रिक्षा जप्त केली. सोपान रमेश तोंडे (वय २७, रा. मुळशी, जि. पुणे), आकाश सुनील नाकाडे (वय २९, सध्या रा. नाईक आळी, धायरी, मूळ रा. बार्शी, जि. सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. तोंडे आणि नाकाडे सराइत चोरटे आहेत. सिंहगड रस्ता परिसरातून त्यांनी दुचारी चोरली होती. आरोपी तोंडे आणि नाकाडे बाह्यवळण मार्गवरील नवले पूल परिसरातून वडगावकडे निघाले होते. गस्त घालणारे पोलीस कर्मचारी देवा चव्हाण, सागर शेंडगे यांना याबाबतची माहिती मिळाली. नवले पूल परिसरात सापळा लावून दोघांना पकडले. त्यांची चौकशी करण्यात आली. चौकशी त्यांनी दुचाकी चोरीची कबुली दिली. तपासात दोघांनी पाच दुचाकी, लॅपटॉप,कॅमेरा चोरीची कबुली दिली.

तोंडे, नाकाडे यांच्याकडून पाच दुचाकी, लॅपटॉप, कॅमेरा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सहायक आयुक्त अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईंगडे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे, सहायक निरीक्षक सचिन निकम, उपनिरीक्षक संतोष भांडवलकर, आबा उत्तेकर, संजय शिंदे, उत्तम तारु, अण्णा केकाण, देवा चव्हाण, सागर शेडगे, विकास बांदल, अमोल पाटील यांनी ही कारवाई केली.

अल्पवयीनांकडून दोन दुचाकी जप्त

मौजमजेसाठी दुचाकी चोरणाऱ्या दोन अल्पवयीनांना भारती विद्यापीठ पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या. भारती विद्यापीठ परिसरात तपास पथकातील पोलीस कर्मचारी मितेश चोरमोले, सागर बोरगे, अभिनय चौधरी गस्त घालत होते. त्या वेळी अल्पवयीन मुले दुचाकीवरुन निघाली होती. दोघांनी दुचाकी चोरल्याची माहिती त्यांना मिळाली. सापळा लावून त्यांना ताब्यात घेतले. दोघांनी दुचाकी चोरीची कबुली दिली. त्यांच्याकडून दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावळराम साळगावकर, गुन्हे शाखेचे निरीक्षक राहुलकुमार खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक नीलेश मोकाशी आणि पथकाने ही कारवाई केली.

विद्यार्थ्यांना आहारात अंडा पुलाव, गोड खिचडी, नाचणी सत्व देण्याचाही शाळांना पर्याय;शालेय शिक्षण विभागाची माहिती

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील पात्र शाळांमधील पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यात येतो. केंद्र शासनाने योजनेंतर्गत लोकसहभाग वाढवून विद्यार्थ्यांना पौष्टिक व वैविध्यपूर्ण आहार पुरविण्यासाठी शाळांमध्ये स्नेहभोजन उपक्रम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. या उपक्रमांतर्गत शालेय व्यवस्थापन समितीस शक्य असल्यास अंडा पुलाव व गोड खिचडी, नाचणी सत्व याचा लाभ देण्याबाबतचा पर्याय शाळांना देण्यात आला असल्याची माहिती शालेय शिक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत पहिली ते पाचवीच्या प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त तसेच सहावी ते आठवीच्या उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने युक्त आहार देण्यात येतो. केंद्र शासनाने सद्यःस्थितीत प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी ५.४५ रुपये आणि उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी ८.१७ प्रतिदिन प्रति विद्यार्थी आहार खर्च मर्यादा निश्चित केली आहे.

केंद्रशासनाने या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना आहाराचा लाभ देण्यासाठी स्थानिक उपलब्ध होणाऱ्या अन्नपदार्थांचा व तृणधान्याचा समावेश करण्याबाबतच्या शक्यता पडताळून पाहण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. त्याअनुषंगाने आहारामध्ये स्थानिक उपलब्ध अन्नधान्य, तृणधान्य व अन्य पदार्थांचा समावेश करुन आहाराचा दर्जा व पौष्टिकता वृद्धींगत करण्याच्या उद्देशाने आरोग्य, आहार, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची समिती गठीत करण्यात आली होती. या समितीच्या शिफारशीनुसार दि. ११ जून २०२४ च्या शासन निर्णयान्वये विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात विविधता आणण्यासाठी विद्यार्थ्यांना तीन संरचित आहार पद्धतीप्रमाणे (ऊपा ण्दलै र्शत) म्हणजेच तांदूळ, डाळी/ कडधान्यापासून तयार केलेला आहार, मोड आलेले कडधान्य (स्प्राऊटस) आणि गोड पदार्थ म्हणून तांदळाची खीर व नाचणीसत्व यांचा समावेश करुन नवीन पाककृती निश्चित करण्यात आली होती.

या पाककृतीमध्ये सुधारणा करण्याकरिता लोकप्रतिनिधी, केंद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीद्वारे आहाराचा पुरवठा करणाऱ्या नागरी भागातील संस्था/ बचत गट, योजनेअंतर्गत कार्यरत असणाऱ्या स्वयंपाकी तथा मदतनीस यांच्या संघटनांची निवेदने प्राप्त झाली होती. ही निवेदने तसेच केंद्र शासनाने निश्चित केलेल्या प्रति दिन प्रति विद्यार्थी आहार खर्चाची मर्यादा विचारात घेता, पाककृती सुधार समितीने शिफारस केलेल्या पाककृतींचा समावेश करुन तसेच, सुधारित पाककृतीनुसार लाभ देण्याबाबतचा दि. २८ जानेवारी २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

या शासन निर्णयातील पाककृतींमधील अनु.क्र. ११ (अंडा पुलाव) व अनु.क्र. १२ (गोड खिचडी/ नाचणी सत्य) या पाककृती पर्यायी स्वरुपात देण्यात आल्या आहेत. या योजनेअंतर्गत नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीमधून यापूर्वी विद्यार्थ्यांना अंडी/ केळी उपलब्ध करुन देण्यात आली होती. केंद्र शासनामार्फत तृणधान्यातील पौष्टिकतेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी या योजनेअंतर्गत तृणधान्याचा वापर वाढविण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत पेसा क्षेत्रातील व आकांक्षित जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना अधिक पौष्टिक आहाराचा लाभ देण्यासाठी मिलेट बार उपलब्ध करुन देण्याचे निर्देशही केंद्र शासनाकडून प्राप्त होते. त्यानुसार संबंधित जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना लाभ देण्यात येत आहे.

या योजनेअंतर्गत नियमित आहारासोबत आठवड्यातून एक दिवस पूरक आहार देण्याची तरतूद आहे. त्याअनुषंगाने राज्यातील पात्र विद्यार्थ्यांना अन्न शिजविणाऱ्या यंत्रणांनी आठवड्यातून किमान एक दिवस फळे, सोयाबिस्कीट, दूध, चिक्की, राजगीरा लाडू, गुळ, शेंगदाणे, बेदाणे, चुरमुरे आदी स्वरुपात पूरक आहार देण्यात येत असल्याचेही शालेय शिक्षण विभागामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे.

क्रिकेट खेळताना हृदयविकाराचा झटका, २७ वर्षीय तरुणाचा मृत्यू ; विरार येथील घटना

वृत्तसंस्था ■ पुणे



वसई : विरार पूर्वेच्या कोपर गावात क्रिकेटचा सराव करताना २७ वर्षीय तरुणाचा मैदानातच हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सागर मोतीराम वझे असे या तरुणाचे नाव आहे. वसई विरार भागात सध्या टेनिस क्रिकेटचा जोर चांगलाच वाढला आहे. विविध ठिकाणी स्पर्धा ही आयोजित केल्या जात आहेत. त्यामुळे विविध गावातील क्रिकेट संघ व खेळाडू यांचा मैदानी सरावाला ही वेग आला आहे.

शनिवारी २५ जानेवारीला सायंकाळी नेहमीप्रमाणे सागर हा आपल्या सहकाऱ्यांच्या सोबत कोपर गावाजवळील मैदानात क्रिकेटच्या सरावासाठी गेला होता. सरावाच्या सामन्या दरम्यान सागर फलंदाजीसाठी उतरला होता. त्यावेळी त्याने लागोपाठ दोन षटकार ठोकत सामन्यात अधिकच रंगत ही आणली होती. मात्र त्याच्या अचानकपणे छातीत दुखून आल्याने तो मैदानावर कोसळला. त्यामुळे इतर मुलांनी त्याच्याकडे धाव घेऊन त्याला त्याच्या नातेवाईकांसह तात्काळ जवळच्या दवाखान्यात उपचारासाठी नेले होते. मात्र पुढील उपचारासाठी दाखल करण्या पूर्वीच्या तपासणीत त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले .ऐन तारुण्यात अवघ्या २७ व्या वर्षी त्याच्या आकस्मिक मृत्यूमुळे कोपर गावासह आजूबाजूच्या परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. सागर याच्या मृत्यू पश्चात त्याचे आई वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे.

संपादकीय...

प्रजासत्ताकाचा पायाच पोकळ!...

'जीबीएस' आजारात अनाकलनीय कारणाने वाढणारी रोगप्रतिकारशक्तीच शरीरातील धडधाकट भागांवर हल्ला करते.अनास्थेची लागण प्रत्यक्ष एखाद्या साथीच्या रोगापेक्षाही भयानक असते. राज्यातील कथित प्रगत शहर पुणे सध्या याचा अनुभव घेते आहे. पुण्यामध्ये गुइलेन बॅरे सिंड्रोमनामक (जीबीएस) आजाराची लागण होण्याचे प्रमाण प्रचंड आहे. हा आजार नवीन नाही, पण त्याचे रुग्ण ज्या प्रमाणात वाढताहेत, ते मात्र घाबरवणारे आहे. हे प्रमाण कशामुळे वाढते, याच्या खोलात गेल्यावर जे दिसते, ते राजकीय हव्यासाचे आणि प्रशासकीय अनास्थेचे किळसवाणे रूप. अर्थात, हे पुण्यात झाले म्हणून किमान त्याची चर्चा तरी होते. तिकडे बुलढाण्यात एका गावात अचानक सुरू झालेल्या केसगळतीची नुकतीच घडलेली घटना आता कुणाच्या खिजगणतीत तरी आहे का, हा प्रश्नच. विदर्भाच्या वाट्याला आलेल्या अनास्थेचा अनुशेष काही भरून निघायला तयार नाही. पुण्यातील या 'जीबीएस'नामक आजाराची लागण होणे खरे तर नवीन नाही. दूषित पाणी वा अन्नामुळे पचनसंस्थेत बिघाड होऊन एखादी व्यक्ती आजारी पडल्यानंतर शरीरात शिरलेल्या विषाणू व जिवाणूंशी मुकाबला करणारी शरीरातील रोगप्रतिकारशक्ती काही वेळा अनाकलनीयपणे इतकी प्रचंड वाढते, की शिरलेले विषाणू व जिवाणू मेल्यानंतर या वाढलेल्या प्रतिकारशक्तीला काय करायचे, हे उमजत नाही. ती मग शरीराच्या मज्जासंस्थेवर हल्ला करते. त्यामुळे स्नायूंवर आघात होऊन गिळण्यास वा श्वसनास प्रचंड अडथळे, हातापायातील त्राण जाणे, पक्षाघात असे विकार उद्भवतात. ही स्थिती गुदरलेल्या व्यक्तीला आधीच काही सहव्याधी असतील, तर तिची प्रकृती अधिक नाजूक होऊन ती व्यक्ती दगावूही शकते. ही लक्षणे असलेले रुग्ण यापूर्वीही होते. फक्त त्यांची संख्या कमी होती. गेल्या वर्षी पुण्यात वर्षभरात असे १८५ रुग्ण आढळले. यंदा त्याचे गांभीर्य अधिक नजरेत भरले, कारण जानेवारीच्या एकाच महिन्यात रुग्णसंख्या शंभराच्या जवळपास जाऊन ठेपली. पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील एका भागात ही संख्या वेगाने वाढली. बाधित भाग हा अगदी पूर्वीपासून महापालिका हद्दीतील नाही. काही वर्षांपूर्वी 'राजकीय' सोयीसाठी महापालिकेला जोडला गेला. या भागाचे वैशिष्ट्य असे, की तो महापालिकेला जोडण्यापूर्वीच येथे जमिनी विकून उंच इमारती बांधल्या गेल्या. त्या एकदा विकायच्या ठरल्या, की बांधकाम व्यावसायिकांना आणि त्या स्वस्तात आहेत म्हटल्यावर ग्राहकांना, 'या इमारतींना पाणीपुरवठा कसा केला जाणार, सांडपाणी कसे वाहून नेले जाणार,' असले प्रश्न पडतच नाहीत. इमारती उभ्या राहतात, लोक राहायला येतात आणि मग हे प्रश्न पडायला सुरुवात होते. त्याची तीव्रता वाढते, ती असे 'जीबीएस'सारख्या आजाराचे रुग्ण वाढू लागल्यावर. आता पुण्यातला जो भाग 'जीबीएस'ग्रस्त आहे, तो आहे खडकवासला धरणाजवळ. तेथून साऱ्या पुण्याला पाणीपुरवठा होतो. मात्र, या भागातील बहुतांश इमारती पाण्याची तहान भागविण्यासाठी अवलंबून आहेत टँकरवर! का? तर ही गावे महापालिकेला जोडल्यावर त्यांना आवश्यक असलेला अतिरिक्त पाणीकोटा राज्य सरकारने मंजूरच केलेला नाही म्हणून. परिणामी, महापालिका या भागांना मोफत टँकर पुरवते. पण, तेवढे पाणी पुरत नाही, त्यामुळे पैसे मोजून खासगी टँकर बोलावले जातात. टँकरवाल्यांची लॉबी कशा प्रकारे नाडते, हे राज्यातील प्रत्येकच शहर अनुभवते. कागदोपत्री टँकरना 'जीपीएस ट्रॅकर' वगैरे लावून त्यांच्यावर लक्ष ठेवण्याच्या सूचना आहेत. पण, प्रत्यक्षात या टँकरमध्ये नेमके कुठले पाणी भरले जाते, याची काहीच तपासणी होत नसल्याने त्या केवळ वदंताच ठरतात. थोडक्यात, या टँकरद्वारे दिलेले पाणी पिण्यास योग्य आहे वा अयोग्य, याचा काहीच मापदंड नाही. मध्यंतरी पुण्यातील अन्य एका भागातील सोसायटीत टँकरद्वारे चक्क अर्धवट पुनर्प्रक्रिया केलेले सांडपाणी रग्गड पैसे घेऊन विकले जात होते. रहिवाशांना त्रास व्हायला लागल्यावर हा प्रकार उघडकीस आला आणि कारवाई झाली. 'जीबीएस'ग्रस्त खडकवासल्याजवळील भागात हे होत नसेल, असे ठामपणे सांगता येत नाही. शिवाय या भागात एक पूर्वापार विहीर आहे, ज्यात धरणातील पाणी जलवाहिनीद्वारे आणून साठवले जाते, जे पंपांद्वारे उचलून नागरिकांकडून वापरले जाते. अनेकदा टँकरच्या बेभरवशी कारभारावर अवलंबून राहण्यापेक्षा पूर्वीचे ग्रामस्थ हेच पाणी पिण्यास वापरतात. हे योग्य प्रकारे शुद्धीकरण केलेले पाणी नाही, त्यात सांडपाणी मिसळण्याचा धोका आहे, कारण सांडपाण्यासाठीच्या वाहिन्यांची व्यवस्था कशी केली, हे प्रशासनालाच माहीत नाही. आता महापालिकेत समावेश होऊनही गावांना शहरातील इतर भागांसारखा बंद नळातून शुद्ध पाणीपुरवठा का नाही, तर जलशुद्धीकरण केंद्रासाठी पुणे महापालिकेने मागितलेली जागा जलसंपदा विभागाबरोबरच्या वादामुळे महापालिकेला अद्याप मिळालेलीच नाही. तो वाद सोडविण्याची राजकीय इच्छाशक्ती अजून कोणी दाखवलेली नाही आणि त्यामुळे या समाविष्ट गावांसाठीच्या पाणीपुरवठा योजना केवळ कागदावर तयार आहेत. 'जीबीएस'चे निदान, उपचार यावर आता भर दिला जातो आहे, महापालिका, राज्य सरकार उपचारांसाठी होणाऱ्या खर्चाचा भार उचलणार आहेत, वगैरे नंतरचे उपाय. ही पश्चातबुद्धीच. तरी, ते करणेही गरजेचेच, कारण या आजाराची तीव्रता एवढी आहे, की व्याधिग्रस्त रुग्णाचा खर्च चाचणी आणि उपचारांसह काही लाखांत जातो आहे. तेव्हा, रुग्णांच्या चाचण्या, निदान व उपचारांवर भर हवाच. त्यासाठी आपण कसा पुढाकार घेतला वगैरे शेखी मिरविण्याची अहमहमिका राजकीय नेत्यांमध्ये लागलीच आहे, शिवाय आरोग्यविषयक काय काळजी घ्यावी, याचे उपाय सुचवून आणि जीबीएसग्रस्त भागातील 'त्या' विहिरीच्या शुद्धीकरणासाठी प्रयत्न सुरू करून प्रशासनही आता आपण कशी पावले उचलली, हे दाखवत आहे. बाहेरचे अन्न, पाणी ग्रहण करू नका, असे प्रशासनाने सांगितले आहे. मात्र, ज्यांचा दिवसच गाडीवरचा एखादा वडापाव खाऊन आणि तेथील पिंपात साठवलेले पाणी पिऊन जातो, त्यांनी काय करायचे हे प्रशासन सांगत नाही! या सगळ्यात मूळ प्रश्न बाजूला राहिले आहेत, त्यांची उत्तरे लोकप्रतिनिधी आणि प्रशासन दोघेही देत नाहीत, कारण ते प्रश्न केवळ पुण्याला नाही, तर मुंबई, नवी मुंबई, ठाणे, नागपूर, नाशिक आणि राज्यातील अन्य मोठ्या शहरांनाही लागू आहेत. राजकीय सोयीसाठी शहरांचा विस्तार करताना, विस्तार होणाऱ्या भागांत महापालिकेच्या बांधकाम शुल्काची झंझट नको, म्हणून महापालिका समावेशाआधीच राजकीय आशीर्वादाने हवी तशी बांधकामे करून घ्यायची आणि मग त्यांचा महापालिका हद्दीत समावेश होऊन मूलभूत सुविधा पुरवायची वेळ आली, की महापालिकांनी निधी नाही म्हणून हात वर करायचे. महापालिकांचा मुख्य उत्पन्नस्रोत असलेला मिळकतकर या अशा समाविष्ट गावांतून गोळा करणेही दुष्कर, ज्याची कारणे पुन्हा राजकीयच आहेत. शिवाय, निवडणुकांत फटका नको, म्हणून आधीपासून महापालिकेत असलेल्या मिळकतींचा कर न वाढविण्याची 'कृपा' मतदारांवर करावी लागते. त्यातून या कराचे मोठमोठे थकबाकीदार फक्त सवलती घेऊन 'अभय' मिळवत राहत असल्याने महापालिका कफल्लक होत राहते. मग कसे मिळणार नागरिकांना चांगले रस्ते आणि शुद्ध पाणी? 'जीबीएस' आजारात अनाकलनीय कारणाने वाढणारी रोगप्रतिकारशक्तीच शरीरातील धडधाकट भागांवर हल्ला करते. ज्यांनी सामान्य माणसाचे जगणे सुसह्य करायचे, ते लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यापेक्षा वेगळे काय करताहेत? एका बाजूला मंगलयान, चंद्रयानची सुखद भाषा आणि दुसरीकडे किमान शुद्ध पिण्याचे पाणीही देता न येणारी आपली व्यवस्था. आपण नुकताच आपला ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा केला. पण त्या प्रजासत्ताकाचा पायाच इतका पोकळ राहणार असेल तर अशा वेळी जगातली तिसऱ्या, चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होऊन आपण नक्की साधणार काय?

!!! क्षुद्रातिक्षुद्रांच्या वेदना-विद्रोह प्रकटक: मुकनायक !!!

३१ जानेवारी: मूकनायक आरंभ दिन विशेष



मूकनायक या पाक्षिकाचा मुख्य उद्देश दलित, गरीब व शोषित लोकांच्या व्यथा- त्यांचा आवाज सरकारपर्यंत आणि इतर जनतेपर्यंत पोहचवणे हा होता. त्यासाठी महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखांमधून बहिष्कृत अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्यायावर प्रकाश टाकला. त्यातून त्या समाजाच्या उन्नतीसाठी तत्कालिन ब्रिटिश सरकारला काही उपाययोजना सुचवल्या. अस्पृश्यांचा उद्धार किंवा विकास होण्यासाठी त्यांनी राजकिय सत्ता व शैक्षणिक ज्ञान मिळवणे गरजेचे आहे, असे त्यांना नेहमी वाटत असे. अशा ज्ञानवर्धक माहितीसह वाचा, श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजी यांचा हा लेख... संपादक.

विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेले मराठी भाषेतील मूकनायक हे एक पाक्षिक आहे. इथूनच त्यांच्या न्याय्य पत्रकारितेस खरीखुरी सुरूवात झाली. ते पाक्षिक त्यांनी समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी सुरू केले होते. दि.३१ जानेवारी १९२० रोजी या पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित करण्यात आला. हे पाक्षिक मुंबईहून निघत असे. पांडुरंग नंदराम भटकर नावाच्या महार जातीच्या शिक्षित तरुणाने या पाक्षिकाचे संपादक केले. कारण डॉ.आंबेडकर हे त्यावेळी सिडनेहॅम कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून काम करीत होते. त्यामुळे त्यांना उघडपणे संपादक पदावर कार्य करणे शक्य नव्हते. म्हणून त्यांनी मूकनायकाच्या व्यवस्थापकपदी ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप यांची नेमणूक केली होती. पहिल्या अंकातील मनोगत नावाचा अग्रलेख आंबेडकरांनी स्वतः लिहिला होता. पुढील तेरा अंकातही त्यांनी लेख लिहिले. मूकनायकासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी २ हजार ५ शे रुपयांची आर्थिक मदत दिली होती. आंबेडकरांनी मूकनायक मराठी भाषेमध्ये प्रकाशित केले, कारण मराठीच त्याकाळी सामान्य जनतेची भाषा किंवा लोकभाषा होती आणि शिकलेली नव्हती, ती केवळ मराठीच समजू शकत होती. मूकनायकच्या पहिल्या अंकात हा मजकूर होता, 'हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजला होय. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, या मनोऱ्याला शिडी नाही आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्याचा मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे त्याच मजल्यात त्यांनी मरावे. खालच्या मजल्यातला माणूस कितीही लायक असो, त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला माणूस मग तो कितीही नालायक असो, त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची प्रज्ञा नाही.'

विश्वरत्न बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेले दोन पाक्षिके मूकनायक व बहिष्कृत भारत हे होत. बाबासाहेब म्हणाले होते, 'कोणतीही चळवळ यशस्वी करण्यासाठी त्या चळवळीचे वर्तमानपत्र असावे लागते. ज्या चळवळीचे वर्तमानपत्र नसते, तीची अवस्था पंख तूटलेल्या पक्षाप्रमाणे होते.' या पाक्षिकाने अस्पृश्य वर्गात जागृती निर्माण केली व त्यांना आपल्या अधिकारांची जाणिव निर्माण करून दिली. मूकनायकाचे ध्येय धोरण स्पष्ट करण्यासाठी



संकलन व सुलेखन - श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी. एक प्राणीप्रेमी. रामनगर वॉर्ड, गडचिरोली. फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

त्यावर बिरुदावली म्हणून जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या अंभगाच्या ओळी छापल्या जात असत- 'काय करू आता धरुनिया भीड। निशंक हे तोंड वाजविले ।।१।। नव्हे जगी कोणा मुकियाची जाण। सार्थक लाजोनी नव्हे हित।।२।।' मूकनायक या पाक्षिकाचा मुख्य उद्देश दलित, गरीब व शोषित लोकांच्या व्यथा- त्यांचा आवाज सरकारपर्यंत आणि इतर जनतेपर्यंत पोहचवणे हा होता. त्यासाठी महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखांमधून बहिष्कृत अस्पृश्य समाजावर होत असलेल्या अन्यायावर प्रकाश टाकला. त्यातून त्या समाजाच्या उन्नतीसाठी तत्कालिन ब्रिटिश सरकारला काही उपाययोजना सुचवल्या. अस्पृश्यांचा उद्धार किंवा विकास होण्यासाठी त्यांनी राजकिय सत्ता व शैक्षणिक ज्ञान मिळवणे गरजेचे आहे, असे त्यांना नेहमी वाटत असे. दि.५ जुलै १९२० रोजी बाबासाहेब पुढील शिक्षणासाठी लंडनला रवाना झाले. त्यानंतर दि.३१ जुलैपासून मूकनायकाचे संपादक पद ज्ञानेश्वर ध्रुवनाथ घोलप यांच्याकडे आले.

पहिल्या अंकाच्या संपादकीयमध्ये जन्मप्रतिज्ञा अशी व्यक्त केली होती- 'आमच्या या बहिष्कृत लोकांत होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यास तसेच त्यांची भावी उन्नती व तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरूपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही. परंतु मुंबई इलाख्यात निघत असलेल्या इतर वृत्तपत्रांकडे पाहिले असता असे दिसून येईल की, त्यातील बरीचशी पत्रे विशिष्ट अशा जातीचे हितसंबंध पाहणारी आहेत. इतर जातीच्या हिताची त्यांना पर्वा नसते. इतकेच नव्हे तर, केव्हा केव्हा त्यांना अहितकारक असेही त्यातून प्रलाप निघतात. अशा वृत्तपत्रकारांना आमचा इशारा एवढाच, की कोणतीही एखादी जात अवनत झाली, तर तिच्या अवनतीचा चटका इतर जातीत बसल्याशिवाय राहणार नाही. समाज ही नौकाच आहे. ज्याप्रमाणे आगबोटीतून प्रवास करणाऱ्या उतारूने जाणूनबुजून इतरांचे नुकसान करावे, म्हणून म्हणा किंवा आपल्या विनाशक स्वभावामुळे म्हणा, जर का इतरांच्या खोलीस छिद्र पाडले तर सर्व बोटीबरोबर त्यालाही आधी किंवा मागाहून जलसमाधी ही घ्यावीच लागणार आहे. त्याचप्रमाणे एका जातीचे नुकसान केल्याने, अप्रत्यक्ष नुकसान करणाऱ्या जातीचेही नुकसान होणार यात बिलकूल शंका नाही. म्हणूनच स्वहितसाधू पत्रकारांनी इतरांचे नुकसान करून आपले हित करावयाचे पढतमूर्खाचे लक्षण शिकू नये.' सद्यस्थितीत मूकनायकाचे १९ अंक उपलब्ध आहेत. त्यांत डॉ.आंबेडकरांनी वैचारिक लिखाण केलेले आढळते. मूकनायक या पत्राने सामाजिक व धार्मिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातही अस्पृश्यांनी बलवत्तर स्थान निर्माण केले पाहिजे, ही जाणीव निर्माण केली. सदर पत्रात विविध विचार, वर्तमानसार, निवडक पत्रातील उतारे, क्षेम, समाचार, कुशल प्रश्न, शेला पागोटे ही सदरे होती. मात्र काही अपरिहार्य कारणास्तव मूकनायक हे एप्रिल १९२३मधे बंद पडले. जरी ते बंद पडले असले तरी ते बहुजन समाजाला आपल्यावरील अन्यायाचा टाहो असा फोडून संबंधितांचे लक्ष वेधता येते, ही शिकवण व प्रखर पत्रकारितेचे विविध पैलू उलगडून दिले. त्याची फलश्रुती म्हणजे आज निर्माण झालेले सर्व समाजातील असंख्य प्रज्ञावंत पत्रकार होत. जय भीम, जय शिवराय, जय जोती, जय क्रांती!

!! मूकनायक पाक्षिकाच्या आरंभ दिनानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !!

माझा भारत...

अव्वल यादीत नाव
भारत रे महासत्ताक
लोकशाही श्रेष्ठ तम
मिरवी प्रजासत्ताक

विज्ञानाची धरे कास
समर्थ असे इतिहास
अन्न धान्य स्वयंपूर्ण
जगा देई सुवर्ण घास

सुसंस्कृतीचे वरदान
बंधुत्वाचे असे भान
थोरवी महापुरुषाची
सर्वांचा करा सन्मान

भीमशक्तीशिवभक्ती
वर्तनात नाही मस्ती
शांती दूत गांधी सूत
दुश्मना वाटे धास्ती

सर्व धर्म सम भाव
भेदाभेदाचे पुसे नाव
परदेशात जावू नका
असे इथेचं खरा वाव

क्रिडाक्षेत्री नाव गाजे
शिक्षणात डंका वाजे
कोरोनाशी लढे कसे
सार्थ उदाहरण ताजे

आज जिंकतो शर्यत
काल होतो रांगत
पाहे तारांगण जगत
भारत केवढा प्रगत

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६.

स्वतंत्र भारत...

अमृतमहोत्सव
आला
समस्या संपल्या नाही
इंग्रजांची पाऊलखुणा
गुलामीची देई ग्वाही

हतबल सारासातबारा
बोलतोयं भिक्षाम् देही
सिमा वाद होई वृध्दी
भावाभावात का दुही

महिला सुरक्षा तोकडी
वासनांगी लाही लाही
खटल्याच्या पडे राशी
निर्णयाची वाट पाही

अर्थव्यवस्था ढासळी
महागाई असह्य साही
कोरोनाच्या संकटात
भर पडली ती विद्रोही

अंतराळी प्रगती गति
पोचलो आम्ही परग्रही
शांतता हरवून बसलो
विवाद चाले दुराग्रही

आपल्याचं हाती असे
रे बदलावी दंडेलशाही
पुढे यावी पिढी नवी
जन बोले त्राही त्राही

स्वतंत्रता कळावा अर्थ
भारत माते त्राही त्राही
बदलाव येईलं नक्की
आश्वासक दिशा दाही

प्रजासत्ताक आहे देश
ती नको हिटलरशाही
संविधान सखोलजाण
हो सुसक्षम लोकशाही

- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६..

प्रत्येक कार्यालयात महिला तक्रार निवारण समिती बंधनकारक समिती गठीत न केल्यास ५० हजार दंड: जिल्हाधिकारी संजय यादव

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणुकीस प्रतिबंध कायद्यानुसार सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालय, आस्थापनेमध्ये अंतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करणे आवश्यक आहे. समिती गठीत न केल्यास ५० हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्यात येईल, अशी माहिती मुंबई शहराचे जिल्हाधिकारी संजय यादव यांनी दिली आहे.

दहा व त्यापेक्षा जास्त कर्मचारी असलेल्या प्रत्येक कार्यालयात समिती गठित करणे आवश्यक आहे. या समितीमध्ये कार्यालयातील वरिष्ठ महिलेची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करावी, तसेच कार्यालयातील कर्मचाऱ्यांमधून सामाजिक कार्याचा अनुभव किंवा कायद्याचे ज्ञान असलेले दोन कर्मचारी सदस्य म्हणून नियुक्त करावेत व महिलांच्या प्रश्नांशी बांधिल असलेल्या अशासकीय संघटनेचा एक सदस्य असावा. त्याचप्रमाणे प्रत्येक कार्यालयाने अंतर्गत तक्रार समिती गठीत केल्याचा फलक दर्शनी भगात लावणे बंधनकारक आहेत. तसेच या अधिनियमानुसार दर तीन वर्षांनी या समितीची स्थापना किंवा पुनर्रचना करणे आवश्यक आहे. असे या कायद्याच्या अमलबजावणी करून घेणारे जिल्ह्याचे प्रमुख उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) तथा जिल्हा अधिकारी गणेश सांगळे यांनी सांगितले आहे.

या कार्यालयांमध्ये अंतर्गत तक्रार समिती गठित करणे अनिवार्य

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संदर्भातील अधिनियमानुसार प्रत्येक शासकीय / निमशासकीय कार्यालय, संघटना, महामंडळे, आस्थापना, संस्था शाखा ज्यांची शासनाने स्थापना केली असेल किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असेल किंवा पूर्ण किंवा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष निधी, शासनामार्फत किंवा स्थानिक किंवा शासकिय कंपनी किंवा नगरपरिषद किंवा सरकारी संस्था यांना दिला जातो. अशा सर्व आस्थापना, तसेच कोणतेही खाजगी क्षेत्र, संघटना किंवा खाजगी उपक्रम/संस्था, एंटरप्रायजेस, अशासकिय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक, प्रवठा, वितरण व विक्री यासह वाणिज्य, व्यावसायिक, शैक्षणिक, करमणूक, औद्योगिक, आरोग्य इ. सेवा किंवा वित्तीय कामकाज पार पाडणारे युनिट किंवा सेवा पुरवठादार, रुग्णालय, शुश्रूषालय, क्रीडा संस्था, प्रेक्षागृहे, क्रीडा संकुले इ. ठिकाणी किंवा अधिनियमात नमूद केलेल्या कामाच्या शासकीय व खाजगी क्षेत्रातील कार्यालयांच्या ठिकाणी अंतर्गत समिती गठित करणे अनिवार्य असल्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी म्हटले आहे.

सर्व बंदरांवर मासेमारीसाठी जाताना खलाशांनी आधार कार्ड बाळगणे अनिवार्य

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : राज्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने सागरी सुरक्षा ही अत्यंत महत्वाची आहे. सागरी सुरक्षा भक्कम करण्याच्या दृष्टीने मत्स्यव्यवसाय विभागाने महत्वाचे पाऊल उचलले आहे. राज्यातील सर्व बंदरांवर मासेमारीसाठी जाणाऱ्या प्रत्येक खलाशाने क्यूआर कोडेड आधार कार्ड जवळ बाळगणे आवश्यक असल्याचे निर्देश मत्स्यव्यवसाय विभाग आयुक्त किशोर तावडे यांनी दिले आहेत.

मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांनी नुकतीच ससून डॉकला भेट दिली होती. त्यावेळी बहुसंख्य खलाशांकडे आधार कार्ड नसल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आली होती. त्यावेळी मासेमारीसाठी जाणाऱ्या खलाशांकडे आधारकार्ड असणे आवश्यक असल्याचे आदेश काढण्याच्या सूचना मंत्री श्री. राणे यांनी दिल्या होत्या. त्याअनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

या सागरी क्षेत्रात मासेमारीसाठी जाणाऱ्या प्रत्येक खलाशाकडे क्यूआर कोडेड आधारकार्ड जवळ बाळगणे आवश्यक आहे. तसेच इंडियन मर्चंड शिपींग ?क्ट १९५८ च्या ४३५(एच)मधील तरतूदीनुसार व महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१ (सुधारित २०२१) मधील कलम ६(४) नुसार देशातील मासेमारी नौकेचा नोंदणी क्रमांक नौकेवर कायम स्वरुपी दिसेल असे रंगविणे आवश्यक आहे. नौकेचा नोंदणी क्रमांक नौकेच्या मागील (वरच्या) भागात दोन्ही बाजूने स्पष्टपणे दिसेल तसेच नौकेच्या केबीनच्या छतावर कोरून रंगविणे बंधनकारक राहील.

याप्रमाणे कार्यवाही केल्यानंतरच नौकांच्या मासेमारी परवान्यांचे नुतनीकरण व मासेमारी टोकन निर्गमित करण्यात येणार आहेत. तसेच या कार्यवाही न करणाऱ्या नौकांच्या मालकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम १९८१(सुधारीत २०२१) अंतर्गत मासेमारी परवाना अटी - शर्ती भंग म्हणून मासेमारी परवाना रद्द करून योग्य ती कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती, आयुक्त श्री.तावडे यांनी दिली.

राष्ट्रीय नमूना पाहणीच्या आरोग्यविषयक सर्वेक्षणात परिपूर्ण माहिती देण्याचे आवाहन

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : भारत सरकारच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या धर्तीवर 'कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च' या विषयावर राष्ट्रीय पातळीवर होणा-या पाहणीत राज्यात अर्थ व सांख्यिकी संचालनालय सहभागी होत आहे. या पाहणीमध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२५ या कालावधीत माहिती गोळा करण्यात येणार आहे. निवड झालेल्या कुटुंबांकडून मागील ३६५ दिवसांमध्ये कुटुंबाच्या आरोग्यविषयक होणाऱ्या खर्चाबाबत विस्तृत माहिती संकलित करण्यात येत आहे. उपरोक्त पाहणीचे निष्कर्ष आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा तसेच केंद्र व राज्य शासनाला नियोजनासाठी व धोरणे राबविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

नमूना तत्वावर निवडण्यात आलेल्या घटकातील कुटुंबाकडून प्राप्त माहितीवर आधारित निष्कर्ष हे राज्यातील लोकसंख्येकरिता अंदाजित केले जातील. सर्वेक्षणाकरीता घरी येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून कुटुंब निवडीचं प्रक्रिया, सर्वेक्षणाची महत्त्वाची माहिती समजून घेण्याची आणि आरोग्यविषयक खर्चासंबंधी योग्य व परिपूर्ण माहिती देण्यासाठी सर्व संबंधित कुटुंबीयांनी पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन आयुक्त, अर्थ व सांख्यिकी व संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांनी केले आहे.

ही पाहणी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये होणार असून या सर्वेक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे शासकीय आणि खाजगी रुग्णालय/दवाखान्यातून मिळणाऱ्या उपचारांवर होणारा खर्च, कुटुंबांचा आरोग्यविषयक होणारा खर्च, सर्व वयोगटातील लसीकरण, गर्भवती महिलांना मिळणाऱ्या सुविधांचा तपशील इत्यादी बाबींची माहिती गोळा करणे हा आहे. या सर्वेक्षणाअंतर्गत कुटुंबाची निवड 'एक वर्ष किंवा एक वर्षापेक्षा कमी वयाचे मूल असणारे कुटुंब' आणि 'मागील ३६५ दिवसांमध्ये रुग्णालयामध्ये दाखल असणारी कुटुंबातील व्यक्ती' यामधून करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाच्या निष्कर्षांचा उपयोग आरोग्य सेवा क्षेत्रात सुधारणा आणि सरकारच्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी होतो. राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर प्रभावी निर्णय घेणे शक्य व्हावे, यासाठी सर्वेक्षणाच्या माहितीची सत्यता व गुणवत्ता अत्यंत महत्वाची आहे. त्या अनुषंगाने माहिती संकलित करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. क्षेत्रीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात आले असून हे प्रशिक्षित कर्मचारी फेब्रुवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ दरम्यान निवडलेल्या कुटुंबांच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन विहित नमुन्यातील माहिती संकलित करतील, असे आयुक्त, अर्थ व सांख्यिकी व संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळवले आहे.

आ.नमिताताई मुंदडा यांच्या माध्यमातून तून आज पर्यंत चिंचोली (माळी)ला १ कोटी पेक्षा जास्त निधी-सुनिल गलांडेपाटील

केज ■ प्रतिनिधी



केजः केज विधान सभेच्या आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांच्या माध्यमातून चिंचोलीमाळी येथे तीर्थक्षेत्र विकास योजनेतून , उर्दू शाळेला २ वर्गखोल्या, विविध भागातील सिमेंट रस्ते व सभागृह या साठी आता पर्यंत एक कोटी पेक्षा जास्त रुपयाचा निधी त्यांनी चिंचोली माळी गावासाठी दिला असून त्यांच्याच माध्यमातून महादेव मंदिरासमोर सात लाख रुपयाच्या सभागृहाचे भूमिपूजन भाजपाचे जेष्ठ नेते सुनिल गलांडेपाटील यांचे हस्ते शुक्रवारी सकाळी ११-०० वाजता करण्यात आले. यावेळी त्यांनी आ नमिताताई अक्षय मुंदडा, व भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर काका मुंदडा यांचे आभार मानून त्यांना धन्यवाद दिले.

यावेळी बोलताना सुनील आबा गलांडे पाटील म्हणाले की,

आज पर्यंत आ.नमिताताई मुंदडा यांच्या विकास निधीतून तीर्थ क्षेत्र विकास निधीतून श्री संत नामदेव महाराज मंदिरासमोरील सभागृह, मुस्लिम समाजाच्या विध्यार्थ्यांसाठी उर्दू शाळेच्या २ वर्ग खोल्याचे बांधकाम, दलित वस्ती सह विविध भागातील सिमेंट रस्ते, काळे वस्तीवरील मुंजाबा मंदिरासमोर सभागृह आणि महादेव मंदिरा समोरील सभागृहासाठी सात लाख रुपयाचा निधी असा एकूण १ कोटी पेक्षा जास्त विकास निधी चिंचोलीमाळी च्या विकासासाठी आ. नमिताताई मुंदडा यांनी दिला आहे. शुक्रवारी सकाळी १०-०० वाजता महादेव मंदिरासमोरील सभागृहाचे भूमिपूजन भाजपाचे जेष्ठ नेते सुनिल गलांडेपाटील यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी चिंचोलीमाळी च्या विकासासाठी भरघोष निधी दिल्याबद्दल तसेच चिंचोली माळी -सारुकवाडी-डोका,- हादगाव - लाखा हा रोड खराब झाल्यामुळे या रस्त्याच्या सिमेंट रोड साठी १२ कोटी रुपये निधी आमदार नमीताताई मुंदडा यांच्या माध्यमातून उपलब्ध झाला असून त्याचे टेंडर झाले आहे लवकरच या रोडचे उद्घाटन करण्यात येणार आहे.लाईटचा प्रश्न असो,दवाखान्याचे काम असो आ.नमिताताई मुंदडा व भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर काकाजी मुंदडा हे गोरगरीब सामान्य माणसाला सतत मदत करत असतात.म्हणून आ नमिताताई अक्षयजी मुंदडा व जेष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा काकाजी यांचे आभार मानून त्यांना धन्यवाद दिले.

या प्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते सुनीलआबा गलांडे पाटील, चेअरमन अरुण तात्या काळे, उपसरपंच धीरज वनवे, ग्रामपंचायत सदस्य, अशोक शिंदे, ग्रामपंचायत सदस्य माणिक गालफाडे, दिपक शिंदे, दगडु दळवे, दिलीप गायकवाड, चंद्रकांत भुजबळ, रविंद्र गलांडे तर मधुकर निंगुळे, सुनील नखाते, सुरज सारुक, अशोक राऊत, दत्ता काळे, मनोज गालफाडे, राजाभाऊ नखाते, संदिप राऊत, विष्णू काळे, जालिंदर गलांडे, राजा सुतार, संजय शिंदे, अवधूत माने, गोरख काळे, ज्ञानोबा घोडके, चांद सय्यद, दत्तु नखाते, नाना नेमट, मोहन नखाते, नंदकुमार घुंबरे, सुनील नखाते, चंद्रकांत पवार, जनार्दन केंद्र, बिभीषण गायकवाड, चंद्रकांत घोडके, कृष्णा पवार, संदिप शिंदे, श्रीकृष्ण मगर, अनिल शिंदे, भगवान हुंबे, जितेंद्र शिंदे, महादेव नखाते, मोहन नखाते, प्रल्हाद सोळंके, अशोक पवार, आबा गलांडे, संदिप राऊत, श्रीकांत शिंदे, रामेश्वर चिंचोलकर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांची बुद्ध विहारात १० दिवसीय महिला उपासिका शिबीराचे उदघाटन

माजलगाव ■ दर्शन डोंगरे








माजलगाव :भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन संपुर्ण एकुण २४ प्रकारचे प्रशिक्षण शिबीर राबवुन धम्म चळवळ गतीमान करण्यासाठी प्रशिक्षित कार्यकर्त्ता निर्माण केल्या जातो याचाच एक भाग म्हणुन भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगांव च्या विद्येमाने त्यागमुर्ती माता रमाई यांच्या जयंतीच्या अनुशंगाने तालुक्यातील महिलांना प्रशिक्षित करण्यासाठी १० दिवसीय महिला उपासिका शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे त्या शिबीराचे उदघाटन दि २९ जानेवारी २०२५ वार बुधवार रोजी करण्यात आले त्या शिबीराचे उदघाटक म्हणुन भारतीय बौद्ध महासभा बीड पर्व चे अध्यक्ष आद बी बी धन्वे सर हे होते सदर शिबीराचे उदघाटन मेनबत्ती प्रज्वलित करुण करण्यात आले महिलांना दहा दिवस संस्थेने ठरवुन दिलेले विषय घेऊन प्रशिक्षण देण्यासाठी केंद्रीय शिक्षीका म्हणुन भारतीय बौद्ध महासभा बीड पुर्व च्या महिला जिल्हा अध्यक्षा आद कमलताई डोंगरे या आहेत तर या उदघाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते तर या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा संस्कार सचिव शामभाऊ वाघमारे, पर्यटन सचिव के व्ही साळवे महिला जिल्हा सरचिटणीस शोभाताई भोजने शहर अध्यक्ष एल आर मस्के सह तालुका पदाधीकारी उपस्तीत होते या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तालुका सरचिटणीस सिद्धार्थ वक्ते यानी केले तर प्रस्ताविक महिला शहर अध्यक्षा वंदना घनघाव यांनी केले

महिती अधिकार कार्यकर्ता महासंघाच्या बीड जिल्ह संपर्क संघाटक पदी वसंत रंगनाथ सोनवणे यांची निवड

केज ■ प्रतिनिधी



केज ; माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सुभाष बसवेकर ,कार्याध्यक्ष शेखर कोलते यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या बैठकीत वसंत रंगनाथ सोनवणे बीड जिल्ह संपर्क संघाटक म्हणून निवड करण्यात आली आहे यावेळी माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष अजय भांगे, बीड जिल्हा कार्यध्यक्ष नितीन ढाकणे, उपाध्यक्ष अँड हरिभाऊ घाईतिडक, बीड जिल्हामुख्य प्रचार प्रमुख डॉ गणेश ढवळे, सरचिटणीस मुबाशीर खतीब बीड जिल्हउपाध्यक्ष किसन दादा कदम,तालुकाध्यक्ष तात्या लहु गवळी बीड जिल्हाप्रचार संघाट केज तालुका अध्यक्ष रमेश गुळभिले यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह संपर्क संघाटक पदी वसंत रंगनाथ सोनवणे यांची निवड करण्यात आली यावेळी मनोगत व्यक्त करतांना वसंत सोनवणे यांनी सांगितले की माहिती अधिकार फेरडेशनचे संपूर्ण नियम अटी व आचारसंहिता यांचे काटेकोरपणे पालन करून या पदावर जबाबदारीने काम करीन या पदाचा कुठलाही गैर वापर करणार नाही सर्व सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत व्यक्त केले आहे.यावेळी पत्रकार मुबाशीर खतीब बीड युवामतचे संपादक आशोक नागरगोजे,अमोल थोरात तात्या गवळी जेष्ठपत्रकार रामदास तपसे वंचितबहुजनआघाडी चे लिंबराज गायकवाड ऑलइंडिय पैंथर सैनेय चे केजतालुका आधयक्ष समाधान बचुटे सर्वनि उपस्थित राहून वसंत सोनवणे यांचा शाल, हार, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. सदर निवडीमुळे मित्र परिवारांकडून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

केज येथील पत्रकार बांधवांच्या वतीने 'मूकनायक' दिन साजरा

केज ■ प्रतिनिधी



केज : केज येथील पत्रकार बांधवांच्या वतीने मूकनायक दिन साजरा करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वंचित बहुजन आघाडीचे लिंबराज गायकवाड तर प्रमुख पाहुणे म्हणून ऑल इंडिया पँथर सेनेचे केज तालुकाध्यक्ष समाधान बुचुटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या व पत्रकार बांधवांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून धूपदीपाने पूजन करून वंदन करण्यात आले.

यावेळी जेष्ठ पत्रकार रामदास तपसे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, ३१ जानेवारी १९२० रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक'या पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. हे पाक्षिक मुंबईहून निघत असे. पांडुरंग नंदराम भटकर नावाच्या सुशिक्षित तरुणाने या पाक्षिकाचे संपादन केले. पहिल्या अंकातील 'मनोगत'नावाचा अग्रलेख हा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतः लिहिला होता. त्यावेळी मूकनायकासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी २ हजार ५०० रुपयाची आर्थिक मदत दिली. पुढे बोलताना तपसे म्हणाले की, सर्व पत्रकार बांधवांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पत्रकारिता करावी. वंचित, पीडित घटकातील व बहुजनांना पत्रकारितेच्या माध्यमातून न्याय देण्याचे प्रामाणिक काम करावे असे बोलताना त्यांनी स्पष्ट केले आहे.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी व पत्रकार बांधवांनी आपले मनोगत व्यक्त करून मूकनायक दिनाचे महत्त्व सांगितले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी लिंबराज गायकवाड म्हणाले की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पहिले पाक्षिक काढले या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यावेळेस पत्रकारितेस सुरुवात केली. म्हणूनच तेव्हापासून ते आज पर्यंत पत्रकारितेच्या माध्यमातून दिन दलितांच्या व बहुजनांच्या अन्यावर आवाज उठवण्याचे काम पत्रकार बांधव करत आहेत. पुढे बोलताना गायकवाड म्हणाले की, नागरिकांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात पत्रकार हे आवाज उठतात म्हणून लोकशाही जिवंत आहे. मूकनायक दिनानिमित्त गायकवाड यांनी सर्व पत्रकार बांधवांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक पत्रकार वसंत सोनवणे यांनी केले तर उपस्थितांचे आभार जेष्ठ पत्रकार मुबाशीर खतीब यांनी मानले.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे लिंबराज गायकवाड, ऑल इंडिया पँथर सेनेचे समाधान बचुटे, ज्येष्ठ पत्रकार अशोक नागरगोजे, रामदास तपसे, मुबाशीर खतीब, वसंत सोनवणे, तात्या गवळी, संजय खळगे यांच्यासह पत्रकार बांधव उपस्थित होते.

माजलगाव कृ. ऊ. बा. समितीचे कर्मचारी सुरेश टाकणखार सेवानिवृत्त



माजलगाव ■ दर्शन डोंगरे

माजलगाव : कृषी उत्पन्न बाजार समितीचे कनिष्ठ लिपिक सुरेश टाकणखार हे दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी शासन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले त्यांनी ३९ वर्ष सेवा दिली त्यांच्या निरोप समारंभाचा कार्यक्रम बाजार समिती कार्यालयामध्ये ३१ जानेवारी रोजी ०४: ०० वाजता संपन्न झाला या निरोप समारंभाला कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त (अण्णा) नरवडे,उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे,संचालक नंदकिशोर सजगणे,अमोल जाधव बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे हे उपस्थित होते व यावेळी सुरेश टाकणखार यांचा आहेर व अंगठी देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला यावेळी सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते

बालविकास प्रकल्प कार्यालयाची प्रतिमा मलीन करणाऱ्या सीडीपीओ बुडुक वर निलंबनाची कारवाई होणार का ?

तेलगाव ■ सोमेश्वर सोनटक्के



तेलगाव : धारूर तालुक्याचे बाल विकास प्रकल्प कार्यालय नेहमीच या ना कारणाने चर्चेत असते. कार्यालय अंतर्गत कार्यान्वित असलेल्या कारभार रामभरोसे असून जबाबदारी असलेले बालविकास प्रकल्प अधिकारी मात्र उंटावरून शेळ्या हाकण्याचे काम करत आहेत त्यामुळे अंगणवाडी कार्यकर्तीचा फटका लाभार्थ्यांना बसत असल्याने लाभार्थ्यांच्या हक्काच्या आहारापासून अनेकांना वंचित राहावे लागत असल्याचे चित्र निर्माण झाले असून या बाबी स जबाबदार असलेल्या बालविकास प्रकल्पाधिकारी बुडूक वर निलंबाचे कारवाई करावी अशी मागणी जोर धरू लागले आहे. तालुक्यात बुडुक यांची एवढी मनवानी वाढली की त्यांच्या निष्क्रिय कार्यपद्धतीमुळे अंगणवाडी कार्यकर्त्यांनी स्वतःची नियमावली तयार केली आहे. गत महिन्यात तर भोगलवाडी गावातील एका अंगणवाडी कार्यकर्त नी दोन क्विंटल चे आसपास आहार चक्क खुल्या बाजारात विक्री करत असताना ग्रामस्थांनी पकडला याच प्रकारामुळे बाल विकास अधिकारी यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भोगलवाडी सारखी घटना घडली असताना अधिकाऱ्यांनी सतर्क होणे गरजेचे होते तरीही त्यांनी संवेदनशील पणा जपला नाही एक महिनाभरात त्यांनी एकाही गावात साधी भेट देण्याचे दायित्व दाखविले नाही यावरून त्यांचा निष्क्रिय पना दिसून येतो. शासनाने अंगणवाड्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पर्यवेक्षिका, विस्तार अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची नियुक्ती केली असतानाही अधिकारी मात्र क्षत्रिय भेटी ऐवजी एसीत बसून काम करणे पसंत करतात. त्यामुळेच अधून मधून अनुचित प्रकार घडतात. प्रत्येक अंगणवाडीत बालके, स्तनदा माता, गरोदर माता, किशोरवयीन मुली यांना दरमहा सकस आहाराचा पुरवठा केला जातो तो हक्काचा आहार मात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचतो की नाही याची वेळोवेळी खातरजमा त्या त्या विभागातील पर्यवेक्षकेने करणे गरजेचे असते. अंगणवाडी केंद्रात प्रामुख्याने सर्वे रजिस्टर, टी एच आर रजिस्टर, हजेरी रजिस्टर, साठा रजिस्टर, लसीकरण रजिस्टर, संदर्भ सेवा रजिस्टर, गरोदर माता रजिस्टर,वजन रजिस्टर, ग्रेडेशन रजिस्टर, अ जीवनसत्व रजिस्टर,अशा प्रकारच्या दहा नोंदवह्या असणे आवश्यक असून त्या अद्ययावत आहेत का याची वेळोवेळी जर तपासणी केली तर आहाराची अफरा तफर वेळीच रोखली जाऊ शकते पण बडुक सारख्या निष्क्रिय अधिकाऱ्यांमुळे विभागाची इज्जत वेशीला टांगली जात आहे त्यामुळं कर्तव्याशी बेमानी करणाऱ्या मुजोर बाल विकास अधिकारी बुळूक याच्यावर खरेच निलंबनाची कारवाई होईल का असा प्रश्न निर्माण झाला आहे.

सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन डॉ.लहाने यांच्या प्रेरणादायी व्याख्यानाचा केजच्या विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा : प्रा.कलढोणे

केज ■ प्रतिनिधी



केजः केजच्या शैक्षणिक वातावरणात गेल्या दहा वर्षांपासून ज्ञानज्योती कोचिंग क्लासेसने आमुलाग्र बदल केले असुन सर्व सामान्य विद्यार्थीही वैद्यकीय व अभियांत्रिकी क्षेत्रात यशस्वी होत आहेत.विद्यार्थांना अभ्यासासाठी प्रेरणा मिळावी म्हणुन लातुर येथील प्रसिद्ध सर्जन डॉ.विठ्ठल लहाने,प्रा.उदय देशपांडे यांचे प्रेरणादायी व्याख्यान दि.९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी दहा वाजता ज्ञानज्योती कोचिंग क्लासेस, डॉ.जाजु काम्पलेक्स , कानडी रोज केज येथे होणार असुन केज तालुक्यातील व शहरातील विद्यार्थी व पालकांनी व्याख्यानाचा लाभ घ्यावा अशी माहिती प्रा.ज्ञानेश कलढोणे यांनी दिली आहे.

फेसबुक वर खोट्या पोस्ट करणार्या विरोधात अब्रु नुकसानीचा दावा ठोकणार- नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड

केज ■ प्रतिनिधी

जनविकास परिवर्तन विकास आघाडीच्या आयोजित हाळदी कुंकूवाच्या कार्यक्रमास सहभागी महिलांचे हारुणभाई इनामदार यांनी मानले आभार



केज : जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने हळदी कुंकू महोत्सवास शनिवारपासून प्रारंभ करण्यात आला आहे, या महोत्सवाला शहरातील महिलांनी उदंड प्रतिसाद दिला आहे.याही पुढे जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी महिलांसाठी विविध उपक्रम घ्यावेत अशा प्रतिक्रिया कार्यक्रमातून महिला वर्गातून उपस्थित केल्या जात आहेत.

हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांचे कौतुक देखील महिला करत आहेत. शहरातील महिलांनी या कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांनी केले होते. या आवाहनाला महिलाकडून उदंड प्रतिसाद मिळाला आहे. भावाच्या हाकेला बहिणींनी ओ देऊन चार हजार बहिणींनी हळदी कुंकवाच्या कार्यक्रमात सहभाग नोंदवून कार्यक्रमाचा आनंद घेतला अशी प्रतिक्रिया इनामदार यांनी माध्यमांशी बोलताना दिली आहे.

नगरपंचायत च्या माध्यमातून केज शहराचा विकास करत असताना व शहरातील जनता नगरपंचायतच्या कामकाजावर खुश असताना काही विघ्न संतोषी मंडळींनी फेसबुकवर पोस्ट टाकली, व भ्राष्टाचाराचे बिन बुडाचे आरोप केले परंतु आम्ही या पोस्टची दखल घेण्या एवढे मोठे नाहित परंतु आम्ही चांगले काम करत असताना आमची नाहक बदनामी करत राहिल्यास त्याविरोधात कोर्टात अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार असल्याचे नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी मध्यम अशी बोलताना पष्ट केले आहे.

गेले पाच ते सहा वर्षापासून जनविकास परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून व हारुणभाई इनामदार यांच्या संकल्पनेतून केज शहरांमध्ये नारी महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये महिलांसाठी हळदीकुंकवाचा कार्यक्रम, उखाण्याचा कार्यक्रम, महिलांना जनविकास परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून एक वस्तू चांगली भेट म्हणून देण्यात येत आहे. त्याचबरोबर अल्पोपहाराची व्यवस्था देखील करण्यात येते.

हळदी कुंकू महोत्सवाच्या माध्यमातून महिला एकत्र येत विचाराची देवाणघेवाण करून एकमेकाशी हितगुज साधत असल्यामुळे या कार्यक्रमावर महिला खुश असल्याच्या प्रतिक्रिया देत आहेत महिला घर काम, व्यवसाय, नोकरी सह इतर कामात वर्षेभर व्यस्त असतात त्यामुळे महिलांना एकमेकीशी संवाद साधता येत नाही.

या जनविकास परिवर्तन आघाडीच्या हार्दिक महोत्सवाच्या माध्यमातून त्यांना हितगुज साधून एकमेकींच्या विचाराची देवाणघेवाण करण्याची संधी उपलब्ध होते त्यामुळे महिलावर्ग खुश असल्याच्या भावना त्यांच्यातून पाहावयास मिळाल्या आहेत.

संबंधित अधिकाऱ्यांच्या आशिर्वादाने तेलगाव येथील त्या इमारती निकृष्ट बांधकाम चालुच

तेलगाव ■ सोमेश्वर सोनटक्के

तेलगाव,: तेलगाव येथे नियोजित ग्रामीण रूग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम चालु असुन, सदरील बांधकाम अत्यंत निकृष्ट व हिन दर्जाचे होत असुन,संबंधित अधिकाऱ्यांनी हे निकृष्ट बांधकाम तात्काळ थांबवण्याची मागणी करूनही, अधिकारी याकडे दुर्लक्ष करत उलट निकृष्ट काम करणाऱ्यांना अभय देत आशिर्वाद देत असल्याने ते इमारत बांधकाम चालुच आहे.तरी संबंधित अधिकाऱ्यांनी निकृष्ट बांधकाम थांबवले नाही तर यासाठी आंदोलन करण्यात येईल. असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

यासंदर्भात माहिती अशी की,बीड जिल्ह्यातील प्रमुख दळणवळणाचे व मुख्य चौरस्त्याचे ठिकाण असलेल्या तेलगाव येथे ग्रामीण रुग्णालय मंजुर झालेले असुन, या ग्रामीण रूग्णालयाच्या नवीन इमारती बांधकाम पहिल्या ट्रामा केअर सेंटरच्या इमारतीवरच दुसरा मजला करत आहेत.मात्र या इमारत बांधकाम अंदाजपत्रकास बगल देत अत्यंत निकृष्ट व हिन दर्जाचे करण्यात येत आहे.संबंधित गुत्तेदार आपल्या मनमानी प्रमाणे काम करत असुन, या कामासाठी गंगेची वाळु न वापरता मातीमिश्रित नदी नाल्याची वाळु सर्रास वापरण्यात येत आहे.तसेच अंदाजपत्रकात दिल्या प्रमाणे लोखंड वापरत नसुन तेही आपल्या मनमानी नुसार वापरत आहे.त्यामुळे असे निकृष्ट बांधकाम झाले तर भविष्यात ते धोकादायक ठरू शकते.या इमारतीत रूग्णांवर उपचार करण्यात येणार आहेत. त्यामुळे ही इमारत बांधकाम दर्जेदार होणे आवश्यक आहे.मात्र संबंधित गुत्तेदाराने अधिकाऱ्यांना हाताशी धरून आपल्या मनमर्जी प्रमाणे निकृष्ट दर्जाचे इमारत बांधकाम करत आहे. तरी संबंधित अधिकाऱ्यांनी गुत्तेदारास हे निकृष्ट बांधकाम बंद करण्याचे कडक आदेश देऊन, त्याच्याकडून अंदाजपत्रकानुसार दर्जेदार काम करून घ्यावे.अन्यथा यासाठी आंदोलन करण्यात येईल. असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

गावाचा सन्मान म्हणजे हृदयस्पर्शी सर्वोच्च सन्मान : प्राचार्य अनिल साकोरे; स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्यु. कॉलेज केंदूरचे मानांकनमध्ये आणखी एक मानाचा तुरा

शिरुर (पुणे) ■ शकील मनियार



शिरूर : महाराष्ट्र शासन विभागाच्या उपक्रमाअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा , सुंदर शाळा संपूर्ण महाराष्ट्रातील शाळा गुणात्मक आणि भौतिक दृष्ट्या किती परिपूर्ण आहे याचे मूल्यांकन करण्यात आले. त्यानुसार तालुका,जिल्हा आणि राज्य स्तरावर शाळा निवडून त्याचे अनुक्रमे प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांक काढण्यात आले. यामध्ये आपल्या सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्यु. कॉलेज केंदूर ज्ञानमंदिराला शिरूर तालुका स्तरावर द्वितीय क्रमांक मिळून रूपये दोन लाखाचे बक्षीसासाठी आपली शाळा पात्र झाली. त्या निमित्ताने ग्रामपंचायत केंदूर आणि समस्त ग्रामस्थ केंदूरच्या वतीने विद्यालयाचे प्राचार्य सर्व शिक्षक, शिक्षिका ,शिक्षकेतर कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना गावाने केलेला सन्मान हा हृदयस्पर्शी सर्वात मोठा सन्मान की ज्याची तुलना आकाशाच्या उंची पेक्षा जास्त वाटते तसेच या गावच्या सन्मानामुळे आम्हा शिक्षकांना आमचे काम करण्यात दहा हत्तीचे बळ मिळत राहील असे गौरवउद्गार आपल्या गावा बद्दल काढून सर्वांना भावनिक केले.त्याबद्दल ग्रामपंचायत केंदूरचे सरपंच,उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य तसेच समस्त ग्रामस्थ केंदूरचे वतीने शाळेचे मुख्याध्यापक,शिक्षक,शिक्षिका , शिक्षकेतर कर्मचारी यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला.याप्रसंगी केंदूर ग्रामपंचायतचे सरपंच उद्योजक श्री.प्रमोद पऱ्हाड यांनी शाळेचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी यांचे कौतुक आणि अभिनंदन केले.आपली सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्यु. कॉलेज केंदूरची शाळा पुणे,मुंबई शहरात भौतिक सुविधा नसतील अशी भव्य,दिव्य आणि गुणात्मक,भौतिक दृष्ट्या परिपूर्ण झालेली आहे त्याबद्दल आम्हाला याचा सार्थ अभिमान वाटतो गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वात जास्त प्राध्यान्य शिक्षणाकडे दिले जाईल आणि विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांच्या परिपूर्ण गुणात्मक शिक्षण , शाळेसाठी आणि संस्थेसाठी आम्ही पाहिजे ते सहकार्य यापुढे ही करत राहणार असे गौरवउद्गार काढले.प्रसंगी विद्यालयातील अपूर्ण असणारी स्वच्छतागृह आणि प्रसाधनगृह सुविधासाठी गावातील सर्व लोक एकत्र येऊन लोकवर्गणी मधून येणाऱ्या काळात सुसज्ज स्वच्छतागगृहआणिप्रसाधनगगृह देण्याचे अभिवचन सरपंच उद्योजक प्रमोद पऱ्हाड यांनी आपल्या मनोगातातून गावचे वतीने दिले.प्रसंगी ग्रामनगरीच्या उपसरपंच सौ शालनताई भोसुरे, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर चे पुणे विभागीय सदस्य राम साकोरे,मा.सरपंच सूर्यकांत थिटे,मा सरपंच अमोल थिटे,विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन अभिजित साकोरे,मा. उपसरपंच भरत साकोरे,मा. सरपंच सुनिल थिटे,मा उपसरपंच भाऊसाहेब थिटे,मा. उपसरपंच मंगेश भालेकर,सामाजिक कार्यकर्ते उमेश साकोरे,शाळा व्यवस्थापन समितीचे तज्ञ संचालक पत्रकार श्रीहरी पऱ्हाड,सामाजिक कार्यकर्ते .ज्ञानेश्वर थिटे,उद्योजक बन्सी पऱ्हाड,सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब साकोरे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी आणि विद्यार्थिनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन रामशेठ साकोरे तर आभार मा.उपसरपंच भरत साकोरे यांनी मानले.

सारणी (आ.) येथे आम्रपाली मागासवर्गीय सेवाभावी संस्थेच्या वतीने हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न



केज ■ प्रतिनिधी

केजः केज तालुक्यातील सारणी (आ.) येथे आम्रपाली मागासवर्गीय सेवाभावी संस्थेच्या वतीने हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न झाला आहे. या हळदी कुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन आम्रपाली मागासवर्गीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा सौ. छायाताई खरात यांच्या संकल्पनेतून व त्यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

प्रत्येक वर्षी आम्रपाली मागासवर्गीय सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्त्या सौ.छायाताई खरात या अनेक उपक्रम घेत असतात त्याचाच एक भाग म्हणून महिलांसाठी हळदीकुंकवाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

ग्रामीण भागातील महिला या शेतातील व घरकामात व्यस्त असतात त्यांना घराबाहेर कार्यक्रमास बाहेरगावी जाण्यासाठी वेळ मिळत नसतो म्हणून सामाजिक कार्यकर्त्या छायाताई खरात यांनी महिलांना एकमेकीशी संवाद साधता त्याचबरोबर विचारांची देवाणघेवाण व्हावी या संकल्पनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला याही पुढे छायाताई खरात यांनी असे विविध उपक्रम घ्यावेत असे महिलांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत व त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

यावेळी संस्थापक अध्यक्षा छायाताई खरात रोहिणी खरात, सरस्वती खरात, मनीषा खरात, सुरेखा खरात,उषा खरात, माया खरात,मनीषाताई खरात, सुशीला खरात, विद्या बनसोडे, वर्षाताई शिंदे,प्रियंका सोनवणे, अर्चना बनसोडे यांच्यासह इतर ही महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

माजलगाव मध्ये दर्जेदार सिनेमे होतात ही अभिमानाची गोष्ट आहे : वीरेंद्र भैया सोळंके; 'प्रिय नदीस ' लघुपटाच्या प्रीमियम शो ला उदंड प्रतिसाद

माजलगाव ■ दर्शन डोंगरे



माजलगावः माजलगाव सारख्या ग्रामीण भागात एवढे दर्जेदार सिनेमे होतात ही खूप अभिमानाची गोष्ट आहे असे प्रतिपादन येथील लोकनेते सुंदरराव सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन वीरेंद्र भैया सोळंके यांनी केले होते

येथील भास्करनाना शिंदे यांनी निर्मिती केलेला प्रिय नदीस (डियर रिव्हर) या बहुचर्चित सिनेमाचा प्रीमियर शो शहरातील माँ वैष्णवी मंगल कार्यालय येथे शहरवासीयांच्या अग्रस्तव १०□२० च्या स्क्रिन वर व आधुनिक साऊंड सिस्टीम मध्ये ठेवण्यात आला होता या वेळी लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विरेंद्र सोळंके ,अभय होके पाटील,जगदीश साखरे, पत्रकार उमेश मोगरेकर,तुकाराम येवले ,कमलेश जाब्रस,नानासाहेब घोडके , ऑड संतोष कसबे ,बाळासाहेब क्षीरसागर , रेखाताई अंबुरे व ईश्वर अप्पा खुरपे आदी मान्यवर उपस्थित होते या वेळी पुढे बोलताना विरेंद्र भैया सोळंके म्हणाले की प्रिय नदीस सिनेमा पाहून खूप आनंद झाला आपल्या माजलगाव च्या मातीत असे कलाकार आहेत हे मी या निमित्ताने पाहत आहे हा सिनेमा माजलगाव सारख्या ग्रामीण भागात स्थानिक कलाकारांनी केला ही आपल्या साठी अभिमानाची बाब आहे आणखीन ही खुप छान सिनेमे तयार व्हावेत अशी अपेक्षाही ही त्यांनी या वेळी केली

तर या चित्रपटाचे निर्माता भास्करनाना शिंदे यांनी मराठवाड्यातील विविध व नवनवीन विषय घेऊन आणि स्थानिक कलाकारांना संधी देऊन चित्रपट निर्मिती केली जाईल अशी ग्वाही या वेळी दिली

'प्रिय नदीस' या चित्रपटाची निर्मिती भास्कर नाना शिंदे यांनी केली तर दिग्दर्शक विष्णू उगले ,कथा पटकथा संवाद लेखक आर प्रकाश यांनी लिहले असुन या चित्रपटाचे डीओपी व संकलन अमर देवने यांनी केली आहे या प्रसंगी चित्रपटा तील सर्व टेक्निशियन ,कलाकार यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मान चिन्ह आणि ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला या चित्रपटास शहरा सह परिसरातील सिनेरसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. सूत्र संचालन ,कसबे सर यांनी तर आभार सुभाष कांबळे यांनी व्यक्त केले.

केज पंचायत समितीचे फर्निचर वर्षेभर धुळखात पडुन असल्याची बातमी प्रसिद्ध करताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात

दैनिक जनप्रभाच्या बातमीचा इफेक्ट

केज ■ प्रतिनिधी



केज : केज पंचायत समिती मध्ये गेल्या वर्षभरापासून फर्निचर धुळखात पडल्याची बातमी आमच्या दैनिक जनप्रभात यांनी वर्तमानपत्रांमध्ये बातमी प्रसिद्ध होताच प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की गेल्या वर्षभरापासून लाखो रुपयांचे फर्निचर पंचायत समितीच्या आवारात धुळखात पडलेले होते यावर गुटखा पान मसाला खाऊन पिचकारी मारून व रिकाम्या पाण्याच्या बाटल्या टाकून फर्निचरचे नुकसान होत असल्याचे आमच्या प्रतिनिधीच्या निदर्शनास आल्याने आम्ही आमच्या दैनिक जनप्रभात या वर्तमानपत्रात बातमी प्रसिद्ध करताच पंचायत समिती कार्यालयाचे कर्मचारी व गुत्तेदार यांनी तात्काळ बातमीची दखल घेऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात केल्याचे निदर्शनास आले.यामुळे लाखो रुपयाचे फर्निचर सामान आता वापरात येत असल्याने नागरिकांतून न्युज चॅनल व दैनिकाच्या वर्तमानपत्रातून बातमी प्रसिद्ध केलेल्या संपादक व पत्रकार बांधवांचे आभार व्यक्त केले जात आहे.

माजलगाव सराफा असोसिएशनची कार्यकारणी जाहिर

माजलगाव ■ दर्शन डोंगरे



माजलगाव : माजलगाव सराफा असोसिएशनचे जेष्ठ सल्लागार/मार्गदर्शक आनंतदादा रूद्रवार व अध्यक्ष रामराजे रांजवण यांच्या उपस्थितीत दि. २७ जानेवारी रोजी झालेल्या बैठकीत माजलगाव सराफा असोसिएशनची कार्यकारणी जाहिर करण्यात आली.

यामध्ये माजलगाव सराफा असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी नारायण सातपुते, सचिव गजानन बोकन, कार्याध्यक्ष मंचक थोरात, सह उपाध्यक्ष सुरेश सोळंके, कोषाध्यक्ष गणेश उगले, सल्लागार राजु दाभाडे, रवी मानधने, महेश ठोंबरे, सहसचिव भागवत गायकवाड, छत्रबुज देशमुख, प्रसिध्दीप्रमुख कृष्णा कुलथे, भागवत चव्हाण, दत्ता येवले, संघटक निळकंठ महाजन, निशांत गडम, रफिक आतार, सदस्य म्हणुन सदाशिव उगले, प्रवीण शहाणे, संजय गायके, सुनिल उदावंत, केशव हरकाळ, अशोक सरवदे, सलीम जरगर, अशोक अंडील, चंद्रकांत देशमुख, दिलीप साबळे यांचा कार्यकारणीमध्ये समावेश आहे. बैठकीस प्रकाश चव्हाण, सुरेश सोनार, मंचक थोरात, राजु दाभाडे, सतीश काशीद, उल्हास रूद्रवार, नारायण सातपुते, सुरेश सोळंके, महेश ठोंबरे, रवी मानधने यांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात संघटनेचे अध्यक्ष रामराजे रांजवण म्हणाले की, हॉलमार्क आल्यामुळे आपल्या व्यवसायामध्ये प्रॉफिट कमी झाले आहे त्यामुळे सर्वांनी एक भाव एक मजुरी करून विकावी जेणेकरून आपल्याला दोन पैसे होतील असे ते म्हणाले कमी भावात सोने - चांदी विकु नये असे आवाहन केले. सुत्रसंचालन गजानन बोकन यांनी केले.

संवेदना जनतेची...रेल्वे अधिकाऱ्याकडून उपनगरीय कोकणवासीयांशी सवता-सुभा

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : 'वसईहून थेट सावंतवाडी' रेलगाडी सुरु करुन कोकणातील मुंबईवासीयांचा प्रवास सुकर करा, अशी मागणी मागील अनेक वर्षांपासून डहाणू ते भाईंदर दरम्यानच्या परिसरातील कोकणवासीयांनी सातत्याने लावून धरली असून रेल्वे बोर्ड मात्र त्यांच्या या मागणीला सतत केराची टोपली दाखवत सवता-सुभा करीत आहे. तद्वतच वसई-विरार, मीरा-भाईंदर, पालघर-डहाणू या तिन्ही भौगोलिक जिल्ह्यातील १० ते १५ लाख कोकणवासीयांवर घोर अन्याय करीत आहे.

सध्या या मार्गावर प्रतिदिन चार-पाच रेलगाड्या सावंतवाडीसाठी कार्यरत आहेत. तथापि या सर्व गाड्यांमध्ये वसई, पालघर व डहाणू येथील प्रवाशांसाठी आरक्षण कोटा अत्यंत अपुरा असल्यामुळे त्यांचे मोठ्याप्रमाणात हाल होत असतात. या सर्व गाड्या इतर राज्यातून भरुन येत असल्यामुळे येथील प्रवाशांना पुरेशा प्रमाणात आरक्षण मिळत नाही. परिणामी त्यांना खाजगी परंतु महागड्या बससेचा पर्यायी प्रवास स्वीकारणे भाग पडले जाते. याच परिस्थितीचा गैरफायदा घेऊन खाजगी प्रवासी कंपन्यांचे ऑपरेटर्स गर्तेत भरडणाऱ्या प्रवाशांची भरमसाठ अशी लूट करीत असतात. मनमानी करत

वाटेल तसे प्रवासी भाडे वसूल करीत असतात. दिवाळी, गौरी-गणपती आणि होळीच्या सणाला व उन्हाळी सुट्टीदरम्यान ही मंडळी कोकणवासीयांची खुलेआम प्रचंड लूट करीत असतात. त्याचाच परिपाक म्हणून गेली कित्येक वर्षांपासून येथील प्रवासी संघटना, प्रतिदिन वसईहून थेट सावंतवाडी दरम्यान किमान एक तरी गाडी सोडण्यात यावी, अशी मागणी करीत आहेत. तथापि रेल्वे बोर्डाचे अधिकारी मात्र कोकणवासीयांच्या या रास्त मागणीची दखलच घेत नाहीत. बुलेट ट्रेनचे स्वप्न पहाणारे व देशभरात भरमसाठ वंदे भारत एक्प्रेस सुरू करु पहाणारे रेल्वे मंत्रालय कोकणवासीयांशी मात्र सावत्रपणाची वागणूक देत सवता-सुभा करीत असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी कोकणातील पत्रकारांचे एक शिष्टमंडळ लवकरच दिल्लीला जाऊन केंद्रीय रेल्वेमंत्र्यांची भेट घेणार आहे.

सारोळा चौफुली बनलीय अवैध धंद्याचा अड्डा

पाचोरा ■ योगेश पवार

पाचोरा : पाचोरा शहरातील मध्यवर्ती भागातून वाहणाऱ्या हिवरा नदी पुलाजवळ असलेल्या सारोळा चौफुली वर अवैध धंदे ना ऊत आला आहे. चौफुलीच्या परिसरात १०० मीटर वर शारदा इंग्लिश मीडियम स्कूल २०० मीटर वर नवीन विठ्ठल मंदिर महामार्ग लगत असणारी वर्दळ या पार्श्वभूमीवर या ठिकाणी चक्री हा नवीन प्रकार जोर धरू पाहत आहे अक्षरशा १८ ते २४ वयोगटातील तरुणांना नादाला लावून कंगाल केले जात आहे, बाजूलाच असलेल्या अवैध दारू विक्रीमुळे तरुण व्यसनाधीनतेच्या आहारी जात आहेत... या अवैध धंद्यांमुळे महिलांना या बाजूने जाताना अक्षरशः मान खाली घालावी लागते. अश्लील शेरेबाजी करीत टारगट पोर या ठिकाणी अक्षरशा रात्री दहा अकरा वाजेपर्यंत धुडगूस घालतात.पोलीस प्रशासन आणि सार्वजनिक बांधकाम विभाग मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याचे चित्र आहे सदरच्या अवैध धंद्यांमुळे महिलांना शाळकरी मुलींना प्रचंड मनःस्ताप सहन करावा लागतोय,गुंड प्रवृत्तीचे हे लोक उघडपणे सांगतात आम्ही सेक्शन देतोय पोलिसांना आमचं कुणी वाकडं करू शकत नाही या विरोधात लोक उघड पणं बोलत नसले तरी हे बंद करण्यात यावं अशी सुज्ञ नागरिकांची अपेक्षा आहे..

केज येथे मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ रास्तारोको !

केज ■ प्रतिनिधी



केजः अंतरवाली सराटी येथे गेली सहा दिवस सुरू असलेल्या मनोज जरांगे पाटील आणि इतर कार्यकर्त्यांच्या समर्थनार्थ गुरुवारी सकाळी १०-३० वाजता येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात सकल मराठा-बहुजन समाजाच्या वतीने रास्तारोको आंदोलन करण्यात आले.

मराठा समाजाच्या आरक्षण व इतर समस्यां सोडवण्यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी २५ जानेवारी रोजी आमरण उपोषण सुरू केले होते. सहाव्या दिवशी जरांगे पाटील यांच्यासह इतर कार्यकर्त्यांची प्रकृती खालावली आहे. सहाव्या दिवसापर्यंत शासनाने त्यांच्या उपोषणाची दखल घेऊन चर्चा केली नाही. महाराष्ट शासनाने त्यांच्या उपोषणाची दखल घेऊन तात्काळ मागण्या मान्य कराव्यात यासाठी केज तालुका सकल मराठा-बहुजन समाजाच्या वतीने येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात एक तास रास्तारोको आंदोलन करण्यात आले. त्यानंतर केज तहासिलच्या नायब तहसीलदार आशा वाघमारे यांनी आंदोलन स्थळी येऊन निवेदन स्वीकारले व याबाबत वरिष्ठ पातळीवर कळवण्याचे आश्वासन दिल्यानंतर हे प्रातिनिधिक आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी केज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी पोलीस तगडा बंदोबस्त ठेवला होता. आंदोलनात दिलीप गुळभिले, हनुमंत भोसले, विनोद शिंदे, शिवाजी ठोंबरे, प्रशांत गुंड, मंगेश देशमुख, राहुल खोडसे, अविनाश इंगळे, हनुमंत घाडगे, बाळासाहेब गलांडे, राधाताई सपकाळ-तपसे, सौ.निर्मला सातपुते, संजना जोगदंड,सौ.कदमताई, सौ.लक्ष्मी भोसले, नवनाथ देशमुख,सूर्यकांत चवरे, यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होते.

यशस्वी उद्योजिका आणि स्वतःची आर्थिक उन्नती साधण्यासाठी शेळीपालन व्यवसाय करावा : डॉ. सुधीर राजूरकर

परभणी ■ वसंत आवटे



परभणी : माविम प्रकल्पाअंतर्गत महिलांच्या सक्षमीकरणाकरिता प्रशिक्षण शेळी पालन करणाऱ्या महिला बचत गटांच्या सक्षमीकरण आणि पशुसखी महिलांचा क्षमता विकास करण्याकरिता घेण्यात आले, यातून पशुसखी एक नवा आत्मविश्वास घेऊन जातील व आत्मनिर्भर होतील असे मत महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुधीर राजूरकर यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपूर व महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने माविम प्रकल्पाच्या (मोड्यूल-२) अंतर्गत पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, परभणी येथे दिनांक २७ ते ३१ जानेवारी या कालावधीत छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील पशुसखीसाठी ५ दिवसीय शेळीपालन प्रशिक्षण घेण्यात आले होते.

या प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी अध्यक्षस्थानावरून डॉ. राजूरकर बोलत होते. यावेळी श्रीमती पंचशीला बागुल, जिल्हा कार्यक्रम सल्लागार, महिला आर्थिक विकास महामंडळ, छत्रपती संभाजी नगर, डॉ. संदीप रिंढे (प्रकल्प सह-समन्वयक, माविम प्रकल्प) हे उपस्थित होते.

प्रशिक्षणामधून मिळालेल्या तांत्रिक ज्ञानातून शेळीपालन हा व्यवसाय शास्त्रीय पद्धतीने केल्यास पशुसखीना यशस्वी उद्योजिका होण्यास आणि स्वतःची आर्थिक उन्नती साधण्यासाठी निश्चितच मदत होईल. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून मिळालेल्या तांत्रिक ज्ञानातून पशुसखीनी आदर्श शेळीपालन फार्म उभारावा अशी अपेक्षा या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्रीमती. पंचशीला बागुल, जिल्हा प्रकल्प सल्लागार, महिला आर्थिक विकास महामंडळ, छत्रपती संभाजी नगर यांनी प्रशिक्षणाच्या समारोप कार्यक्रम प्रसंगी व्यक्तत केले. प्रशिक्षण समन्वयक डॉ. संदीप रिंढे यांनी प्रास्ताविकात प्रशिक्षणादरम्यान देण्यात आलेली व्याख्यान, प्रात्यक्षिक इ. विषयी सविस्तर माहिती दिली. पशुसखींनी कौशल्य विकासांतर्गत पाच दिवसांचे निवासी प्रशिक्षण यशस्वी रित्या पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्राचे वाटप महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुधीर राजूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. चैतन्य कदम यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. संदीप रिंढे यांनी केले. महाराष्ट्र पशु व विज्ञान विद्यापीठ नागपूरचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने यांची प्रेरणा तसेच महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ.सुधीर राजूरकर यांचे मार्गदर्शन आणि मुख्य प्रकल्प समन्वयक डॉ. धनंजय देशमुख यांचे मदतीने प्रशिक्षनाचे समन्वयक डॉ. संदीप रिंढे, सह समन्वयक, डॉ. अनिता चप्पलवार, डॉ. संजयकुमार लोंढे, डॉ. महेश चोपडे सर, डॉ. दिपाली पाटील, डॉ. मकरंद खरवडकर, डॉ. कल्याण टेकाळे, सहाय्यक कुलसचिव व सहाय्यक नियंत्रक-श्री. ऋषिकेश कांबळे आणि लिपिक तथा टंकलेखक श्री. अविनाश जाधव तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. सचिन भुसे, डॉ. लक्ष्मीकांत गड्डेवार, डॉ. संकेत भादुले, डॉ. चैतन्य कदम, डॉ. प्रतिक वाघ, डॉ. नेहा पुराम, डॉ. विजया गुरनाळकर आणि डॉ. शुभांगी धायगुडे यांनी परिश्रम घेतले.

एरंडोल नगर वाचनालयाच्या अध्यक्षपदी माजी नगरसेवक जगदिशभाऊ ठाकूर , कार्याध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा.वा.ना.आंधळे , चिटणीसपदी रवींद्र लाळगे यांची सर्वानुमते निवड

दै, जनप्रभात छ.संभाजीनगर प्रतिनिधी ■ मोहन आखाडे



छत्रपती संभाजीनगर : एरंडोलः येथील १५७ वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेल्या नगर वाचनालयाची आज दि.३० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता सर्वसाधारण वार्षिक सभा संस्थेचे मावळते कार्याध्यक्ष मा.किशोर काळकर यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे निष्ठावान कार्यकर्ते तथा संस्थेचे अध्यक्ष स्व.डॉ.वा.पु.जोशी यांचेसह विविध क्षेत्रातील दिवंगतांना व कुंभमेळयात दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या भाविकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यानंतर संस्थेचे ग्रंथपाल संतोष वंजारी यांनी मागील सभेचे प्रोसिडिंग वाचून मंजूर केले.सन २०२४-२५ व सन २०२५-२६ या दोन वर्षासाठी सर्वानुमते एरंडोल येथील सामाजिक कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक जगन्नाथ ठाकूर उर्फ जगदीशभाऊ ठाकूर यांची नगर वाचनालयाच्या अध्यक्षस्थानी, तर कार्याध्यक्षपदी खान्देशातील सुप्रसिद्ध साहित्यिक तथा वक्ते प्रा.वा.ना.आंधळे तर चिटणीसपदी निवृत्त शिक्षक तथा लेखक रवींद्र लाळगे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.याचवेळी सहचिटणीस यापदी संतोष वंजारी तर संचालकपदी मा.किशोरभाऊ काळकर,गुरुप्रसाद तुकाराम पाटील,जाधवराव भीमसेन जगताप,प्रवीण आधार महाजन, परेश किशोर बिर्ला, डॉ.प्रेमराज गंगाधर पळशीकर,अमोल अशोक काबरा, रवींद्र प्रभाकर सोनार,सुदर्शन मधुकर देशमुख यांची निवड करण्यात आली. सभेचे संपूर्ण कामकाज ग्रंथपाल देवेंद्र संतोष वंजारी,लिपिक संजय बाळकृष्ण अग्निहोत्री,शिपाई गोकुळ अरुण मोरे यांनी केले. नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करीत माननीय किशोरभाऊ काळकर यांनी बुके देऊन स्वागत केले.

खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झालेल्या या सभेत मा.किशोरभाऊ काळकर यांनी यथोचित मार्गदर्शन केले.नवनियुक्त अध्यक्ष जगदीश भाऊ ठाकूर ,कार्याध्यक्ष प्रा.वा.ना.आंधळे यांची मनोगते झाली.आभार प्रदर्शन सहचिटणीस संतोष वंजारी यांनी केले.

विद्यार्थीसह, पोलीस पाटीलांना व तलाठी आदिनां केले मार्गदर्शन न्यायालयातील न्यायधीशांनी नवीन कायद्याविषयक केले मार्गदर्शन

काटोल ■ प्रशांत पवार



काटोल : ०१ जुलै २०२४ पासून संपुर्ण भारतात भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ आणि भारतीय साक्ष अधिनियम हे नवीन कायदे लागू करण्यात आलेले आहेत. सदर कायद्याच्या माहिती व प्रसिद्धी करिता आता स्वतः न्यायाल्याचे न्यायधीश यांनी पुढाकार घेत जनजागृती व मार्गदर्शन कार्यशाळा घेत महाविद्यालयातील विद्यार्थी, पोलीस पाटील, तलाठी यांना तीन सत्रात गुरवार ला मार्गदर्शन पर कार्यक्रम घेत जनजागृती केली यात विद्यार्थी, पोलीस पाटील व तलाठी वर्गाला मार्गदर्शन करण्यात आले.

नवीन कायद्याचा उद्देश यासह नवीन कायदयातील बदल, कायदयाबाबत शंकेचे निरसन करणे, कायदयाविषयी जनजागृती, प्रसिध्दी व प्रसार करण्याकरीता खुद्दआता न्यायालयातील न्यायधीश पुढे आले असुन कायद्यात झालेलं बदल आदी बाबींवर काटोल येथे त्यांच्या वतीने महाविद्यालयीन विद्यार्थी मार्गदर्शन केले तर दुसऱ्या सत्रात पोलीस विभागाला खांद्याला खांदा लावून काम काम करणाऱ्या आणि ग्रामीण भागात महत्वाची भूमिका बाजावणाऱ्या काटोल विभागातील पोलीस पाटील मंडळीला मार्गदर्शन करीत कायद्यातील बदल आणि शिक्षेचे प्रावधान लक्षात आणून देतात त्यानंतर या बाबी पोलीस पाटील म्हणुन काम करतांना अतिशय महत्वाचे असल्याने नीट समजून घेण्याचे आव्हान केले सदर दोन्ही कार्यशाळा नबीरा महाविद्यालय येथेल सभागृहात पार पडला यावेळी सदर कार्यशाळेत प्रथम वर्ग न्याय अधिकारी काटोल न्यायालय एम. झेड. ऐ. ऐ कुरेशी, न्यायधिश जे. जे. ईनामदार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शासकीय अभियोक्ता काटोल अमरदीप चवरे, अध्यक्ष काटोल वकील संघ दिपक केने, शासकीय अभियोक्ता सागर देशमुख, अनुजा तेलंग, निलांबरी बागडे, विधी अधिकारी, प्राचार्य डॉ सुनिलकुमार नविन, उपविभागीय अधिकारी बापु रोहम, पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम, कोंढाळी ठाणेदार राजकुमार त्रिपाठी उपस्थित होते.

सदर कार्यशाळेचे आयोजन पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, अप्पर पोलीस अधिक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात काटोल पोलीस उपविभागाच्या वतीने करण्यात आले होते.

ज्या देशाची जीडीपी दुधापेक्षा दारूवर चालत असेल तर तो देश विश्वगुरू कसा बनेल?

काटोल ■ प्रशांत पवार



काटोलः भारत देशात व्यसनाधीनता इतकी वाढली की तरुणांच्या रांगा डेअरीच्या समोर लागताना दिसून येत नाही तर दारूच्या दुकानासमोर लागताना दिसत आहे तरुणांची आज सलून च्या दुकानासमोर आयब्रो तसेच त्यांच्या अन्य फॅशन वाढले आहे परंतु त्यांच्या रेशनच्या व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे राजकारणी लोकं जेव्हा दारू फुकट पाजतात तेव्हा गल्ली पासून ते दिल्ली पर्यंत बदलून जाते आणि दारू पिणारे जेव्हा विकत घेऊन पितात तेव्हा देशाची जिडीपी वाढून जाते असेच म्हणावे काय असा सवाल नागरिक करीत आहे. अशांनी स्वामी विवेकानंद यांच्या स्वप्नातील देश कसा पुढे जाईल शेतकरी मध्यम व्यापारी कर्जबाजारी झालेले आहे नावापूर्वी शेती आणि मध्यम व्यापार उरलेला आहे गावातील दुकानदार कर्जबाजारी झाला आहे याचा फटका शहरातील दुकानावर सुद्धा झाला आहे शासनाचे एकही धोरण तरुणांना शेतकऱ्यांना मध्यम व्यापाऱ्यांना ऊर्जा देणारे उरलेलं नाही त्यामुळे सुद्धा तरुण शेतकरी मध्यम व्यापारी यांच्यामध्ये उदासीनता निर्माण होऊन व्यसनाधीनतेकडे सर्वांचे पाय पडत असल्याचे चित्र समोर दिसत आहे याकरीताच शासनाने व्यसनाधीनता वाढू नये यासाठी तरुण शेतकरी मध्यम व्यापारी हे कसे बलवान होतील याचे धोरण आखून त्याची अंमलबजावणी लवकरात लवकर करण्यात यावी तरच भारत देश सुजलाम सुफलाम बनून तरुणांच्या रांगा दारूकडे न वळता दुधाकडे वळेल अशी चर्चा रिधोरा तालुका काटोल येथील विचारवंतांच्या बैठकीमध्ये बुधवारला रंगू लागली होती.

प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित; ग्रामसभांमध्ये 'सारथी' योजनेचा गजर ;(लक्षित घटकांपर्यंत पोहोचण्याची अनोखी तऱ्हा)

काटोल ■ प्रशांत पवार



काटोल : छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण आणि मानव विकास संस्था, पुणे (सारथी) यांच्या वतीने मराठा, कुणबी, कुणबी मराठा आणि मराठा कुणबी समाजातील विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती लक्षित घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी एक अनोखी पद्धत कार्यान्वित करण्यात आली.

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून 'ई-जनरेशन' या संस्थेत प्रशिक्षण घेणाऱ्या नेहा डवरे, देव्यानी डवरे, गायत्री वालकर, सावरी उमप, प्रांजली गावंडे, सुवर्णा काळे, साक्षी मुसळे, धनंजय जिचकार, छकुली रेवस्कर, वैष्णवी वाळके, साक्षी केने, भाग्यश्री केने या सारथी प्रशिक्षणार्थ्यांनी तालुक्यातील पारडसिंगा, माणिकवाडा, कोंडासावळी, येनवा, येनिकोनी, खामली, रिधोरा, आजनगाव, माळेगाव, चनकापूर या गावांमध्ये आयोजित ग्रामसभांमध्ये 'सारथी' उपक्रमाची माहिती दिली.

सारथीमार्फत लक्षित घटकांतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. तसेच, छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्त्व विकास व संगणक कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत 'छत्रपती संभाजी महाराज सारथी डिजिटल एम्प्लॉयबिलिटी एनहॅन्समेंट प्रोग्रॅम' हा सहा महिन्यांचा संगणक अभ्यासक्रम निःशुल्क सुरू आहे. मात्र, अद्यापही या योजनांची संपूर्ण माहिती तळागाळातील लाभार्थ्यांपर्यंत पोहोचली नाही.

ग्रामसभेत लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ एकत्र उपस्थित असतात, त्यामुळे या सभेत दिली गेलेली माहिती अधिक प्रभावीपणे लक्षित घटकांपर्यंत पोहोचू शकते, असे प्रतिपादन एमकेसीएलचे विभागीय समन्वयक शशिकांत देशपांडे यांनी केले. तसेच, काटोल विधान क्षेत्रातील किमान शंभर गावांमध्ये प्रशिक्षणार्थ्यांच्या माध्यमातून 'सारथी'च्या योजना पोहोचविण्याचा मानस 'ई-जनरेशन' चे संचालक योगेश भोसे यांनी व्यक्त केला.

देवळी येथे संगम स्टील प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

गौळ ■ योगेश कांबळे



गौळ : संगम प्रीमियर लीग २.०: संघभावना देवळी औद्योगिक परिसरात एस. एम. डब्लू इस्पात ऑफ बिजनेस यांचे कडून संगम प्रीमियर लीग २.० या रोमांचक आंतर-कंपनी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन एस. एस. एन. जे. महाविद्यालयाच्या मैदानावर करण्यात आले. सदर स्पर्धेत कंपनीतील एकूण एकूण आठ संघांनी आपला सहभाग नोंदविला.

या मध्ये अंतिम विजेता संघ एएए विभाग राहिलेला असून, उपविजेता क्रॉन्ट्रॅक्टर चा संघ राहिला.

तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत कर्मचाऱ्यांनी खेळातील कौशल्ये दाखविले. यावेळेस त्यांच्या रोजच्या कामाच्या व्यापातून आनंद मिळवू शकले. या उपक्रमाने संचभावना आणि आपसी ऐक्य वाढवण्यास मोठी मदत केली.

कार्यक्रमाला कंपनीचे ॲसेट हेड दीपक सुमह चीफ ऑफ प्रोक्योरमेंट आशिष भट्ट, व्हीपी कॉर्पोरेट अफेअर्स श्याम मुंदडा, चीफ माकेटिंग ऑफिसर मनु जॉर्ज, व्हीपी टेक्निकल जालोक चंद्रा उपस्थित होते. ही स्पर्धा जीएम कमर्शियल्स विशाल खजान्धी, व्हीपी सेल्स आणि मार्कटिंग शिवांश अग्रवाल आणि सीएफओ रुपेश सतपती अधिकारी यांच्या उपस्थितीत खेळविण्यात आली. आनंदी कर्मचारी ही कोणत्याही यशस्वी संस्थेची खरी ताकद असते. या उपक्रमा?द्वारे, कर्मचाऱ्यांसाठी असे वातावरण निर्माण करण्याचा कंपनीचा नेहमीच प्रयत्न असतो, जिथे ते कामाच्या तणावातून मुक्त होऊन सहकाऱ्यांसोबत वेळ घालवू शकतील. या स्पर्धेत चुरशीच्या सामने पाहायला मिळाले, ज्यामध्ये विजेत्यांना रोख बक्षिसे, सन्मान चिन्हे आणि प्रमाणपत्रे देऊन त्यांच्या खेळाचा सन्मान करण्यात आला.

या खेळाकडे केवळ एक खेळ म्हणून न पाहता, संगम प्रीमियर लीग २.० ही सकारात्मक कार्यसंस्कृतीचे आणि आपसी नातेसंबंध बळकट करण्याचे प्रतीक असून, सकारात्मक ऊर्जा वाढवणाऱ्या उपक्रमांना नेहमीच प्राधान्य देत असल्याने या स्पर्धेचे नेहमीच आयोजन करत राहू, असे व्यवस्थापनाकडून, सांगण्यात आले.

व्यावसायिकदृष्ट्या नाही. तर त्यांचा आत्मविश्वास आणि आनंद वाढेल अशा पद्धतीने नेहमीच समर्थन देत राहणार

आंजी येथे सहजीवन मेळाव्याचे आयोजन

वर्धा ■ योगेश कांबळे



वर्धा: महात्मा गांधी आयुर्विज्ञान संस्थान सेवाग्राम अंतर्गत कार्यरत कस्तुरबा ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र आणि सहजीवन समन्वय समिती, आंजी यांच्या संयुक्त विद्यमाने आंजी येथील जिल्हा परिषद मराठी शाळेमध्ये सहजीवन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायक कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता ज्येष्ठ नागरिकांचे जीवनमान उंचावणे आणि दोन पिळ्यांमधील दुरावा कमी करून सामूहिक संवाद व समज प्रगल्भ करणे,

सहजीवन मेळाव्यात विविध प्रकारचे सामाजिक आणि शारीरिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण स्टॉल्स लावण्यात आले. सहजीवन झाड, संवेदनशील पालकत्व, पोषक आहार, चित्रकला कार्यशाळा, आजी-आजोबांसोबत आनंद घेणाऱ्या क्रिया, मजेदार खेळ, बुद्धीला चालना देणारे खेळ, व्यसनविरोधी जनजागृती, आणि आरोग्य तपासणी अशा विविध, मनुष्यतेची गोडी आणि सुसंवादाची भावना जागविणाऱ्या उपक्रमांनी भरलेला हा मेळावा अत्यंत यशस्वी ठरला. या कार्यक्रमाला आंजीतील सर्व नागरिकांचा प्रतिसाद मिळाला. यामध्ये प्रत्येक वयाच्या नागरिकांनी सहभाग घेतला, आपल्या अनुभवांची देवाणघेवाण केली आणि सकारात्मक ऊर्जा घेतली. जिल्हा परिषद माजी सभापती जयश्री गफाट यांचा या कार्यक्रमात सहभाग आणि उपस्थिती याने एक वेगळीच ऊर्जा निर्माण केली. त्यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रमाला अधिक महत्त्व प्राप्त झाले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आंजी प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व सीएचओ, आशा वर्कर, एएनएम, तसेच कस्तुरबा ग्रामीण प्रशिक्षण केंद्रातील सर्व कर्मचारी आणि प्रकल्पाच्या टीमने परिश्रम घेतले.

राज्य युवा पुरस्कार सन २०२३-२४ साठी अर्ज करण्याचे आवाहन'

नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : राष्ट्र व राज्य निर्माणामध्ये युवकांची महत्वपुर्ण भुमिका असुन युवा वर्ग मोठया संख्येने, संस्था राज्यात सामाजिक कार्य करीत आहे. युवा मध्ये असलेल्या सुप्त गुणांना वाव देणे त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याला प्रोत्साहन देणे त्यांचा गुणगौरव करणे आवश्यक आहे. राज्याचे युवा धोरण अंतर्गत युवांच्या सामाजिक कार्याचा गौरव करण्यासाठी राज्य युवा पुरस्कार शासन निर्णय दि. १२ नोव्हेंबर २०१३ नुसार देण्यात येतात.

सन २०२३-२४ या वर्षात राज्यस्तरावर राज्य युवा पुरस्कार क्रीडा विभागाच्या क्षेत्रिय विभागस्तर नुसार प्रत्येक विभागातील १ युवक, १ युवती, व १ नोंदणीकृत संस्था यांना देण्यात येणार आहे. या पुरस्काराचे स्वरुप युवक युवती रोख ५०,०००/- संस्थेस १.०० लक्ष तसेच गौरव पत्र, सन्मानचिन्ह राहणार आहे.

राज्य युवा पुरस्कारासाठी युवक अथवा युवा विकासाचे कार्य करणा-या संस्था यांची गत तिन वर्षामध्ये केलेल्या कामगीरीचे मुल्याकन विचारात घेण्यात येणार असुन राज्य युवा पुरस्कार सन २०२३-२४ साठी अर्ज दिनांक १५.०२.२०२५ पर्यत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना जिल्हा क्रीड अधिकारी कार्यालय किंवा ूेः//ज्रै.ऽऽ.दन.ग्ह या संकेतस्थळावर उपलब्ध राहतील. राज्यातील जास्तीत जास्त युवा व युवा विकासाचे कार्य करणा-यांनी पुरस्काराचे अर्ज सादर करण्याचे आवाहन आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी केलेले आहे.

अधिक माहितीसाठी कार्यालयात, कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक, यांनी कळविले आहे.

माय लेकीस आणले सुरत मधून शोधून; कोणताही ठोस पुरावा नसतांनाही पुलगाव पोलिसांनी आणले शोधून

विरुळ (आ.) ■ विनोद महाजन



पोलीस स्टेशन पुलगाव येथील मिसिंग क्रमांक ५५/२०२४ दिनांक १२/११/२०२४ मधील मिसिंग महिला नामे सौ. दिपाली निलेश फरांदे, वय २६ वर्ष व तिची मुलगी कुमारी लावण्या निलेश फरांदे वय २ वर्ष ६ महिने रा. इंझाळा, ता. देवळी, जि. वर्धा यांचे शोध करिता मा. पोलीस अधीक्षक सा. वर्धा यांचे परवानगीने प्/राजेंद्र हाडके, झ्/गितेश देवघरे, थ्झ्/सोनी राठोड असे सुरत गुजरात राज्यात जाऊन पोलीस स्टेशन सचिन जिल्हा सुरत गुजरात येथे जाऊन मिसिंग महिला व मुली बाबत कोणताही ठोस पुरावा नसताना पोलीस स्टेशन पुलगाव येथील मिसिंग पथकाचे प्रमुख राजेंद्र हाडके, गितेश देवघरे, सोनी राठोड व सायबर सेलचे पोहवा दिनेश बोथकर, अक्षय राऊत यांनी वेळोवेळी सहकार्य केल्याने पोलीस स्टेशन सचिन जिल्हा सुरत येथील स्थानिक पोलिसांच्या मदतीने मिसिंग महिला व मुलीचा शोध घेतला असता सदर ठिकाणी बाहेर राज्यातील परिवार व मजूर वर्ग राहत असल्याने यांचा शोध घेण्याकरिता फार अडचणी निर्माण झाल्या असताना सुद्धा त्यांनी अथक परिश्रम घेऊन मिसिंग महिलेचा व मुलीचा शोध घेण्यास यशस्वी झाले.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक वर्धा श्री. अनुराग जैन, माननीय अपर पोलीस अधीक्षक श्री सागर कुमार कवडे, माननीय सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री राहुल चव्हाण, उपविभाग पुलगाव, माननीय पोलीस निरीक्षक राहुल सोनवणे पोलीस स्टेशन पुलगाव यांचे मार्गदर्शनात मिसिंग पथकाचे प्रमुख राजेंद्र हाडके, गितेश देवघरे, विनोद रघाटाटे, सोनी राठोड व सायबर सेल वर्धा चे पोहवा दिनेश बोथकर, अक्षय राऊत व पोलीस मित्र सुरज खडसे यांनी केली.

बॅरि, शेषराव वानखडे महाविद्यालयात बॅरिस्टर वानखडे स्मृतीदिन, व महात्मा गांधी पुण्यतिथी दिन साजरा

खापरखेडा ■ दिलीप येवले

खापरखेडा, दिलीप येवले:- महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक ३० जानेवारी रोजी महात्मा गांधी पुण्यतिथी व बॅरिस्टर शेषराव वानखेडे स्मृतिदिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ. राजेंद्र राऊत व प्रा. डॉ. जनबंधू यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर टाले यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम घेण्यात आला. सर्वप्रथम महात्मा गांधी व बॅरिस्टर शेषरावजी वानखेडे यांच्या फोटोला हारार्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

प्रस्तुत कार्यक्रमात प्रास्ताविक करताना राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ प्रतिभा गडवे यांनी असे सांगितले की, आजचा दिवस म्हणजे, दुग्ध शर्करा योग आहे. जगाला विश्वस्ताची संकल्पना सांगणारे महात्मा गांधी व त्या विश्वस्तांच्या संकल्पनेला प्रत्यक्ष जीवनात आणणारे बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांचे जीवन हे निश्चितच युवकांना प्रेरणादायी ठरणारे आहे. दोन्हीही महान आत्म्यांनी त्यांच्या काळातील परिस्थितीवर मात करण्यासाठी महान असे कार्य केले त्यांच्या या स्मृतिदिनी विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्यापासून प्रेरणा मिळून नेतृत्व निर्मितीसाठी त्याचा उपयोग व्हावा हाच आजच्या कार्यक्रमाचा हेतू आहे.

त्यानंतर कार्यक्रमाला प्रमुख वक्ता म्हणून लाभलेले इंग्रजी विभाग प्रमुख प्राध्यापक डॉक्टर धनराज शेटे यांनी महात्मा गांधी व बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांच्या जीवन कार्यावर विस्तृत प्रकाश टाकला. त्यांनी असे सांगितले की, महात्मा गांधींच्या सत्य व अहिंसेच्या तत्त्वज्ञानाने देशात क्रांती घडवून आणली, अमूल्य असे तत्वज्ञान महात्मा गांधीजींचे होते म्हणूनच आज केवळ देश पातळीवर नाही तर जग पातळीवर प्रसिद्धी असलेले ते नेता बनले .तसेच बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय देताना त्यांनी असे सांगितले की, सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या बॅरिस्टर शेषराव वानखेडे यांनी राजकारण समाजकारण ,खेळ व क्रीडा क्षेत्रामध्ये अमूल्य असे योगदान दिले. ते एक उत्कृष्ट राजकारणी तर होतेच परंतु समाजकारणाची जाण त्यांना होती. आज नागपूर शहरांमध्ये शेतकऱ्यांच्या हितासाठी बांधलेले शेतकरी भवन त्याची साक्ष देते.

यानंतर अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉक्टर आर. जी. टाले यांनी असे सांगितले की, बॅरिस्टर शेषराव वानखेडे व महात्मा गांधी यांचे वैचारिक मूल्य निश्चितच आज आहे त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन मार्गक्रमण करावे. आज त्यांच्या या स्मृतिदिनी महाविद्यालयात रोगनिदान शिबिराचे आयोजन केलेले आहे त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी व पालकांनी घ्यावा असे आव्हान देखील त्यांनी यावेळेस केले.

या प्रसंगाचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विद्यापीठाचे ब्रँड ?म्बेसिडर म्हणून विद्यापीठातून प्राप्त टी-शर्ट चे वाटप करण्यात आले.

सरते शेवटी दोन्ही महान विचारवंतांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील समस्त प्राध्यापक वर्ग विद्यार्थी परिषदेचे प्राध्यापक डॉ. गजानन सोमकुवर, ग्रंथपाल डॉक्टर संगीता चोरे, व इतर समस्त प्राध्यापक वृंद व विद्यार्थी ,महाविद्यालयाचा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचा शिपाई वर्ग व विद्यार्थी वर्गाने विशेष सहकार्य केले या संपूर्ण कार्यक्रमाचे

लहान आर्वी येथील कु. चैतन्या मेहेरे जिल्हास्तरीय पोष्टर स्पर्धेत तालुक्यातुन प्रथम

वर्धा येथील उप-प्रादेशिक परीवहन कार्यालया तर्फे रस्ता सुरक्षा विषयावर घेतली होती स्पर्धा

लहान आर्वी ■ सुनिल साबळे



लहान आर्वी: लहान आर्वी येथील कु. चैतन्या कीशोर मेहेरे हीचा उप-प्रादेशीक परीवहन विभागामार्फत घेण्यात आलेल्या 'जिल्हास्तरीय पोष्टर स्पर्धेत' आष्टी तालुक्यातुन प्रथम क्रमांक आला आहे. कु. चैतन्या कीशोर मेहेरे हीला वर्धा येथें सहाय्यक पोलिस निरीक्षक सुचिता मांडवले, यांच्या हस्ते शिल्ड व प्रमाणपत्र देऊन सन्मनीत करण्यात आले. यावेळी पोलीस अधिकारी अजय चौधरी, कलाध्यापक संघटनेचे अध्यक्ष आशिष पोहाने, सचिव किशोर उकेकर उपस्थित होते. हिच्या यशस्वी साठी लोकमान्य विद्यालय आष्टीचे मुख्याध्यापक विजय दाभाडे, उपमुख्याध्यापक किशोर बोबडे , शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. संगीता खोंडे तसेच संस्थेचे सचिव उमेश देशपांडे तसेच सर्व संचालकांनी कु. चैतन्याच्या यशाबद्दल तीचे अभिनंदन व्यक्त केले. तिने आपल्या यशाचे श्रेय आई वडील व शाळेचे कलाशिक्षक गोवर्धन इंगळकर आणि सुनिल डांगे यांना दिले आहे.

सिध्दी शुगर येथे सर्वरोग निदान शिबीर संपन्न

कंधार ■ संतोष कांबळे



कंधार लोहा : उजना प्राथमिक आरोग्य केंद्र अंधोरी व सिध्दी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लि, महेश नगर, उजना यांच्या संयुक्त विद्यमाने कारखाना येथे दि. ३० जानेवारी २०२७ रोजी ऊसतोडणी, वाहतूक कामगार, कारखान्यातील कर्मचारी, कामगार व कारखाना शेजारील ग्रामस्थांसाठी सर्वरोग निदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. सदर शिबीराचे धन्वंतरी देवीची पुजा करुन उदघाटन माजी मंत्री बाळासाहेब जाधव यांनी केले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष शिवाजीराव देशमुख हे होते. या नियोजित कार्यक्रमास कारखान्याचे व्हाईस प्रेसिडेंट पी.जी.होनराव तसेच, अहमदपुरचे तालुका वैद्यकिय अधिकारी डॉ. मोरे, प्राथमिक आरोग्य केंद्र अंधोरी येथील वैद्यकिय अधिकारी डॉ. सायली यादव डॉ. मोहिनी कासले व तसेच डॉ. गुणाले, डॉ. वहमवार, डॉ. कराड, डॉ. मुंढे, डॉ. तनुप्रिया घोडके व डॉ. उगले इत्यादींनी उपस्थित राहुन आरोग्याची तपासणी करुन मार्गदर्शन केले. महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दुपारच्या सत्रात सर्वरोगनिदान शिबीरास भेट देवून मार्गदर्शन केले व आरोग्य विभागाच्या स्टाफचे वेळोवेळी होत असलेल्या सहकार्याबद्दल अभिनंदन केले.

सदर शिबीरामध्ये बालरोगतज्ञ, स्त्रिरोगतज्ञ, नेत्ररोग तज्ञ, हृदयरोग तज्ञ व तसेच जनरल फिजीशियन तज्ञ डॉक्टर उपस्थित राहुन आरोग्याची तपासणी केली. व तसेच आवश्यकतेनुसार गरोदर माता तपासणी, रक्त, लघवी, बी.पी. (उच्च रक्तदाब.) शुगर (मधुमेह), ई.सी.जी.ची तपासणी व किरकोळ सर्व रोगावर निदान करुन त्यावरील औषधे मोफत देण्यात आली. सर्वरोगनिदान शिबीरात ऊसतोडणी, वहातुक कामगार, कारखान्यातील कर्मचारी, कामगार व कारखाना परिसरातील ग्रामस्थ ४७७ इत्यादी लोकांनी आरोग्याची तपासणी करुन घेवून लाभ घेतला.

सदर प्रसंगी आरोग्य विभागाचा स्टाफ कुंभार, नाईक, सुरनर, सुदेवाड, फड, बुके व गायकवाड यांनी उपस्थित राहुन उपचार करुन ऊसतोड/वहातुक कामगार, कारखान्यातील अधिकारी, कर्मचारी, कामगार व कारखाना शेजारील ग्रामस्थांचे आरोग्याची योग्य ती तपासणी करुन बहुमोल सहकार्य केले.

याप्रसंगी कारखान्याचे जनरल मॅनेजर एस. आर. पिसाळ, जनरल मॅनेजर (केन) पी.एल. मिटकर, चिफ अकौंटंट .एल.आर. पाटील, चिफ फायनांस ऑफिसर आनंद पाटील, कंपनी सेक्रेटरी एस.टी. सावंत, ऊसविकास अधिकारी वाय.आर. टाळे, ई.डी.पी. मॅनेजर प्रशांत जाधव, परचेस ऑफिसर धनराज चव्हाण, सिव्हील इंजिनिअर साळुंके, सुरक्षाअधिकारी व्ही.एच. डोंगरे, हेड टाईमकिपर धनंजय टिळक, दुधसंकलन अधिकारी संदीप पाटील, सि. ?ग्री ओव्हरशिअर टी.बी. वाघमारे, सेफ्टी सुपरवायझर विकास राठोड, आदी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर सर्वरोग निदान शिबीरास हजर ऊसतोड मजुर, वहातुक कामगार व ग्रामस्थांना अल्पोपहाराची व चहाची सोय सिध्दी शुगर कारखान्याचे वतीने करण्यात आली होती. आयोजित केलेल्या सर्वरोगनिदान शिबीरासाठी ऊसतोडणी मजुर, वहातुक कामगार, व तसेच कारखाना शेजारील ग्रामस्थांने मोठ्या संख्येने उपस्थित राहुन उत्स्पूर्वक प्रतिसाद दिला.

याकामी कारखान्यातील अधिकारी व कर्मचा-यांनी विशेष परिश्रम घेवून सर्वरोग निदान शिबीर यशस्वी करण्यास महत्वाची भुमिका बजावली. सदर कार्यकमाचे सुत्रसंचलन टेकाळेसर व आभार कारखान्याचे व्हाईस प्रेसिडेंट पी.जी.होनराव साहेब यांनी मानले.

आदर्श ग्रामपंचायत धामणेर गावची सुकन्या सुहाना इनुस शेख हिची आरोग्य महिला सेविका म्हणून निवड

कोरेगाव ■ मेमुद्दीन शेख



कोरेगावः रहिमतपूर साताराआदर्श ग्रामपंचायत धामणेर या गावात लहानाची मोठी झालेली सुहाना खरंच हिचा आदर्श ही घे ण्यासारखा आहे घरची परिस्थिती बिकट व हालाकीची असताना देखील परिस्थितीवर मात करून तीणे हे यश संपादन केले विविध प्रसंगांना न घाबरता शेवटी तिने बाजी मारली सातारा जिल्हा परिषद अंतर्गत झालेल्या सर्व सेवा भरती मध्ये पहिल्याच प्रयत्नात आरोग्य विभागाच्या आरोग्य सेवक महिला पदाची परीक्षा प्रवर्गातून उत्तीर्ण झाली तिला पत्रकार शेख यांनी विचारले असता तिने आपली वस्तुस्थिती मांडली ती म्हणाली माझ्या घरची परिस्थिती बिकट होती माझ्या आई-वडिलांनी शेतात काम करून वडिलांनी मोल मजुरी करून आम्ही दोन बहिणी व आई वडील यांचे खर्च व शिक्षणाचा खर्च भागत नव्हता म्हणून मी हॉस्पिटलमध्ये प्रायव्हेट जॉब केला व शिक्षणाचा खर्च त्यामध्ये करायची कारण माझ्या शिक्षणाचा खर्च व या जायचा खर्च ते देऊ शकत नव्हते म्हणून मला माझ्या शिक्षणासाठी मला काम करावे लागले मला आई-वडिलांनी खूप धीर दिला जेव्हा मला आरोग्य विभागातफै माझी निवड झाली मला पत्र देण्यात आले हे मी पत्र जेव्हा घरी दाखविले मी त्यांच्या डोळ्यात आनंद अश्रू पाहिले व माझे सारे कष्ट मी विसरूनच गेले कारण मला माझ्या कष्टाची व माझ्या आई-वडिलांच्या मेहनतीची फळ मला मिळाले धामणेर गावचे आदर्श सरपंच शहाजीराव शिरसागर (अण्णा) यांनी त्याची कौतुक केले व ग्रामपंचायतीचे आजी- माझी सदस्य गावातील थोर मंडळी व महिला सदस्य यांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष भेटून त्याचे कौतुक केले व मुस्लिम समाजातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आरिफ मुलानी व हाजी शौकत भाई मुलानी दस्तगीर मुलानी अब्दुल भाई मुलानी महिला आघाडीच्या आसमा सुरज शेख व संतोष शिरसागर यांनी त्याच्या घरी जाऊन तिचा सत्कार केला सुहाना व तिच्या आई वडिलांनी सर्वांचे आभार मानले

गॅस पाईपच्या गोडाऊनला भीषण आग;आगीत पाईपलाईनचे साहित्य जळून खाक;पुणे बेंगलोर हायवे वरील कराड जवळची घटना

कराड ■ कुलदिप मोहिते



कराड : पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावरील कराड तालुक्यातील गोटे गावच्या हद्दीत एका गॅस पाईपच्या गोडावूनला भीषण आग लागल्याची घटना गुरुवारी दुपारी १:३० वाजण्याच्या सुमारास घडली. आगीत पाईपलाईनचे साहित्य जळून खाक झाले. दरम्यान, या घटनेनंतर अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून त्यांच्याकडून आग विझवण्याचे काम सुरु आहे. सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही

याबाबात अधिक माहिती अशी की, कराड तालुकयातील गोटे गावच्या हद्दीत पुणे बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर गॅस पाईपचे काम करणाऱ्या ठेकेदाराचे पाईपलाईन ठेवलेले गोडावून आहे. या गोडावूनला आज, दुपारी अचानकच आग लागली. आगीच्या धुराचे लोट मोठ्या प्रमाणात होते.

आगीत पाईपलाईनचे साहित्य जळून खाक झाल्याने लाखोंचे नुकसान झाले. दरम्यान आगीचे कारण अस्पष्ट आहे. त्यानंतर आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाच्या गाड्या दाखल झाल्या. त्यांचा आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू होते.

पोलीस आयुक्त अमिताभ गुप्ता कारवाईच्या गर्तेत; कोट्यावधींची मालमत्ता उजागर उच्चपदस्थ अधिकाऱ्यावर कारवाईमुळे पोलीस दलात प्रचंड खळबळ

मुंबईतील सांताक्रुझ येथे २२ कोटी रुपयांचा एक आलिशान फ्लॅट, पुण्यात तब्बल रुपये २५ कोटीचा आलिशान व्हिला

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : पुण्याचे माजी पोलीस आयुक्त आणि राज्याचे विद्यमान अपर पोलीस महासंचालक अमिताभ गुप्ता यांच्या अडचणीत वाढ होण्याची चिन्हे दिसत आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुप्ता यांच्या संपत्तीची गुप्त चौकशी पूर्ण केली असून, आता उघड चौकशीसाठी परवानगी मागितली आहे. उच्चपदस्थ आयपीएस अधिकाऱ्याची अशा प्रकारे चौकशी होण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असावी. त्यामुळे या प्रकरणाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते सुधीर आल्हाट यांनी केलेल्या तक्रारीवरून ही चौकशी सुरू करण्यात आली होती. गुप्त चौकशीत तथ्य आढळल्यानंतर आता एसीबीच्या महासंचालकांकडे उघड चौकशीची परवानगी मागण्यात आली आहे. या परवानगीनंतर अमिताभ गुप्ता यांच्यासमोरील अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

आल्हाट यांच्या तक्रारीनुसार, अमिताभ गुप्ता यांच्याकडे कोट्यावधींची मालमत्ता आहे. पुण्यातील ?मनोरा टाऊनशिप मधील स्वीट वॉटर व्हिला प्रकल्पात त्यांचा एक आलिशान व्हिला आहे. या व्हिलाची किंमत तब्बल २५ कोटी रुपये इतकी असल्याचा दावा आल्हाट यांनी केला आहे. याशिवाय, मुंबईतील सांताक्रुझ येथे त्यांचा २२ कोटी रुपयांचा एक आलिशान फ्लॅट असल्याचेही आल्हाट यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे.

एवढ्या मोठ्या प्रमाणात संपत्ती जमविल्यामुळे अमिताभ गुप्ता यांच्या उत्पन्नाच्या स्रोतावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एसीबीने केलेल्या गुप्त चौकशीत 'त्यामुळेच आता एसीबीने उघड चौकशीसाठी परवानगी मागितली आहे.

गुप्ता यांच्या उघड चौकशीला लवकरात लवकर परवानगी मिळावी, अशी मागणी सुधीर आल्हाट यांनी केली आहे. तसेच, गुप्ता यांनी पुणे पोलीस आयुक्तपदाच्या कार्यकाळात दाखल केलेले काही गुन्हे आणि दिलेले रिव्हॉल्वर परवाने यांचीही चौकशी करण्याची मागणी आल्हाट यांनी केली आहे. त्यामुळे, गुप्ता यांच्या अडचणी आणखी वाढण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

उच्चपदस्थ अधिकाऱ्यावर झालेल्या या कारवाईमुळे पोलीस दलात प्रचंड खळबळ माजली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास कसा होतो आणि त्याचा काय परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एसीबीच्या महासंचालकांनी उघड चौकशीला परवानगी दिल्यास अमिताभ गुप्ता यांना त्या चौकशीला सामोरे जावे लागणार आहे.

महावितरणाचा भोंगळा कारभार; मंगेश साध्ये यांच्या नेतृत्वात गावकऱ्यांचे निवेदन

गंगापूर ■ सुनिल झिंजुर्डे पाटील



गंगापूर : गंगापूर तालुक्यात यंदा समाधानकारक पाऊस झाल्याने जिल्ह्यातील प्रकल्पांमध्ये मुबलक पाणीसाठा उपलब्ध आहे. मात्र, महावितरण कंपनीच्या तुघलकी कारभारामुळे पाणी असूनही ते शेताला देता येत नाही. या प्रकारामुळे शेतकऱ्यातून कमालीचा संताप व्यक्त होत आहे. ग्रामीण भागात विजेची वाट पाहण्यातच शेतकऱ्यांचा दिवस निघून जातो, अशी स्थिती आहे.

मागील काही दिवसात गंगापूर तालुक्यातील वीज वितरण कंपनीचा कारभार मोठ्या प्रमाणात हलगर्जीपणा दिसून येत आहे. वारंवार वीज खंडित होत असल्याने शेतकऱ्यांसह सर्वसामान्य त्रस्त आहेत. याबाबत वरिष्ठांकडे तक्रारी करूनही उपाययोजना केली जात नसल्याने शेतकऱ्यांनी आता दाद मागायची तरी कोठे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मा.मुख्य.अभियंता यानि या प्रश्नात लक्ष घालण्याची मागणी जोर धरत आहे.

आंबेवाडी शिवारामध्ये जामगाव फिटर वरील सात ते दहा दिवसापासून वारंवार येत-जा करत असून त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत येत अजून लाईट नसल्यामुळे पिके जळत असून यामुळे शेतकरी निराश झाले आहेत तरी मुख्य अभियंता यांनी शेतकऱ्यांना लाईट सुरु करून देण्यात यावी व हे बाब अत्यंत गंभीर असून २५.०१.२०२५ या दिवशी आंबेवाडी फिटर वरील सर्व शेतकऱ्यांना सोबत घेऊन युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष मंगेश साध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात येईल असा इशारा मंगेश साधे, सोपान देशमुख, संजय देशमुख, अविनाश पानकडे, दिलीप साधे, स्वरूपचंद राजपूत, चंदन राजपूत,.पोपट पानकडे, रमेश साधे, सुरेश बोर्डे, बाबासाहेब पानकडे,मोहन पानकडे, धनंजय सोनवणे, अनिल पानकडे, रोहित भांगे, गजू मोरे,रिजवान पठाण,मच्छिंद्र पानकडे , सौरभ संतोष पानकडे, सिताराम डोंगरे, बाळू राजपूत यांच्यासह मोठ्या प्रमाणात उपस्थित शेतकरी यांनी निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

लोकमान्य विद्यालयाची कु ऋतुजा गजरे सविधान परीक्षेत द्वितीय

आष्टी (श)वर्धा ■ सुनिल मांडवे



आष्टी (शहीद): अश्वघोष सांस्कृतिक मंच वर्धा तर्फे आयोजित भारतीय संविधान अमृत महोत्सव निमित्त जिल्हास्तरीय स्वयंअध्ययन संविधान सन्मान परीक्षा २०२४:२५ मध्ये सर्व जिल्हाभर घेण्यात आली होती लोकमान्य विद्यालयाची कु ऋतुजा गजरे तिने दुसरे क्रमांक प्राप्त केला लोकमान्य विद्यालयात उपप्रचार्य किशोर बोबडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि शील देण्यात आले

जिल्हास्तरीय परीक्षेचा निकाल खालीलप्रमाणे वर्ग ५ ते ८ ' अ ' गट प्रथम क्रमांक चैतन्य डीगेश्वर बालपांडे-वर्ग ६ वा माडेल हायस्कूल कारंजा (घाडगे) द्वितीय क्रमांक चेतना प्रफुल खेळकर - वर्ग ८ वा डॉ बी. आर. आंबेडकर विद्यालय हिंगणघाट तृतीय क्रमांक अभिन्या कन्हैया पाटील- वर्ग ८ वा कृषक कन्या विद्यालय, आर्वप्रथम प्रोत्साहन कु. सेजल सचिन कांबळे- वर्ग ७ वा परिवर्तन मिशन स्कूल वर्धाद्वितीय प्रोत्साहन ऋतुजा राहुल गजरे वर्ग ८ वा लोकमान्य विद्यालय आष्तृतीय प्रोत्साहन शर्वरी संदीप भोयर- वर्ग ८ वा नवजीवन माध्यमिक विद्यालय वाबगाव ता देवळचतुर्थ प्रोत्साहन सोहम विनोद रामटेके- वर्ग ७ वा स्वावलंबी विद्यालय खरांगपाचवे प्रोत्साहन १) कार्तिकी सु. लोणकर वर्ग ७ वा लोकमान्य विद्यालय आष्टी अश्वघोष सांस्कृतिक मंच तर्फे प्रोत्साहन १)विहान मोरेश्वर मुदावणे वर्ग ७ वा कै. आनंदराव मेघे विद्यालय बोरगाव (मेघे) २)संबोधी संतोष नाखले वर्ग वा महिला आश्रम बुनियादी प्राथमिक विद्यालय वर्धा सर्व प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन वर्ग ९ ते १२ वा (ब गट)प्रथम क्रमांक मयूर सुनील पाटील (वर्ग ९ वा) - नूतन विद्यालय तळेगाव (शा. प) ता आष्टी द्वितीय क्रमांक सानिया गुणवंत सोमकुवर- वर्ग (११ वा) स्वावलंबी विद्यालय, खरांगणा ता आर्वी तृतीय क्रमांक आदिती मनोज कळमकर(वर्ग १० ड) - डॉ बी. आर. आंबेडकर विद्यालय हिंगणघाटप्रथम प्रोत्साहन समृद्धी पृथ्वीराज धूपे वर्ग (९ वा) कस्तुरबा विद्यामंदिर सेवाग्राम द्वितीय प्रोत्साहन सांची दिनेश गायगोले वर्ग ९ वा (ख) न्यू इंग्लिश हायस्कूल वर्धा तृतीय प्रोत्साहन पूनम राजेश लांजेवार वर्ग १० वा- श्री संत केजाजी महाराज विद्यालय तरोडा ता जि वर्धा चतुर्थ प्रोत्साहन कु आर्या कैलास जसुतकर वर्ग ९ वा

मॉडेल हायस्कूल कारंजा घाडगे पाचवे प्रोत्साहन अर्थ लालचंद सोनटक्के वर्ग १० वा अण्णासाहेब गुंडेवार विद्यालय नारा ता कारंजा अश्वघोष सांस्कृतिक मंच तर्फे प्रोत्साहन १) कु धनेश्वरी रघुनाथ पाठे वर्ग ११ वा- हूतात्मा राष्ट्रीय विज्ञान महाविद्यालय आष्टी २) विभा शंकर गवाले वर्ग ९ वा क- इंदिरा गांधी विद्यालय अल्लीपूर सर्व प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक सदिच्छा देण्यात आल्या

जलालखेडा-कोंढाळीचे अप्पर तहसील कार्यालय कधी करणार : सलील देशमुखांचे चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र

काटोल ■ प्रशांत पवार



तत्कालीन महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन देतांना सलील देशमुख.

काटोलः या भागाचे आमदार असतांना अनिल देशमुख यांनी तत्कालीन महसुल मंत्री यांना नरखेड तालुक्यातील जलालखेडा व काटोल तालुक्यातील कोंढाळी येथे अप्पर तहसील कार्यालय करण्याची मागणी केली होती. त्यानुसार महसुल विभागाने जिल्हाधीकारी यांना तसा प्रस्ताव तयार करण्याची मागणी केली होती. यावरुन हा प्रस्ताव तयार करुन तो शासनाला सादर करण्यात आला आहे. त्या प्रस्तावाला मंजुरी देवून जलालखेडा व कोंढाळी येथील अप्पर तहसील कार्यालय कधी करणार ? असा प्रश्न उपस्थीत करीत या दोन्ही ठिकाणच्या अप्पर तहसील कार्यालय मंजुरी द्यावी मागणी करणारे पत्र राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते सलील देशमुख यांनी महसुल मंत्री तथा नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना लिहुन केली आहे.

क्षेत्रफळाच्या दृष्टीने नरखेड व काटोल तालुका हा फार लांब होत असल्याने याचा पर्याय म्हणुन जलालखेडा व कोंढाळी येथे अप्पर तहसील कार्यालय सुरु करण्याची नागरीकांकडुन मागणी होत होती. यावरुन या भागाचे आमदार असतांना अनिल देशमुख यांनी १९ जानेवारी २०२३ ला तत्कालीन महसुल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना पत्र लिहले होते. यासंदर्भात अनिल देशमुख यांनी विधानसभेत सुध्दा हा मुद्दा उचलला होता. यानंतर दोन्ही ठिकाणी अप्पर तहसील कार्यालय करण्यासाठी जिल्हाधीकारी, नागपूर यांना प्रस्ताव मागीतला होता. त्यानुसार तसा प्रस्ताव तयार करुन जिल्हाधीकारी यांनी शासनाला पाठविला आहे. तेव्हापासुन याचा पाठपुरावा हा मंत्रालय स्तरावर करण्यात येत आहे. यासाठी मी स्वतः तत्कालीन महसुन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची अनेक वेळा भेट घेतली होती अशी माहिती सुध्दा सलील देशमुख यांनी दिली.

जर हे दोन्ही अप्पर तहसील कार्यालय झाले तर याचा फायदा हा मोठा प्रकरणात शेतकरी, विद्यार्थी व सामान्य नागरीकांना होणार आहे. त्याचा पैसा आणि वेळ सुध्दा वाचणार आहे यासाठीच अप्पर तहसील कार्यालयाची मागणी पुढे आली होती. मंत्रालय स्तरावर हा प्रस्ताव गेल्या अनेक दिवसापासुन धुळखात पडलेला आहे. आता हा विभाग चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडेच असल्याने आणि ते या जिल्हाचे पालकमंत्री असल्याने त्यांनी यात लक्ष देवून जलालखेडा व कोंढाळी येथील अप्पर तहसील कार्यालयास मंजुरी द्यावी अशी मागणी सुध्दा सलील देशमुख यांनी केली.

स्व. दिलदार सिंग टेहल सिंग बावरी यांच्या स्मृती प्रित्यर्थ

आष्टी (श)वर्धा ■ शरद शेंद्रे



आष्टीः सेवादार युवा समिती गुरुनानक नगर तळेगाव ,द्वारा आयोजित राज्यस्तरीय ज ल-२ भव्य टेनिस बॉल सामन्याचे आयोजन चेतना क्रिकेट ग्राउंड आर्वी रोड तळेगाव येथे नुकतेच पार पडले. या कार्यक्रमाचे उद्घाटक सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अनंत मोहोड यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी प्रमुख अतिथी उपविभागीय पोलीस अधिकारी डी. पी. खंडेराव, अध्यक्ष मराठा शिक्षण संस्था दिलीप निंभोरकर तळेगाव, संचालक राजस्थान रॉयल क्रिकेट रोमी भीडर, 'उपाध्यक्ष वर्धा जिल्हा काँग्रेस कमिटी चंद्रशेखर जोरे', पोलीस निरीक्षक मंगेश भोयर', वनपरिक्षेत्र अधिकारी व्ही एस सूर्यवंशी तळेगाव, परिक्षेत्र अधिकारी जी व्ही सोनवणे, अध्यक्ष गुरुद्वारा कमिटी अकाल सिंग जुने तळेगाव, आष्टी तालुका शिवसेना उभाटा अनिल गुरव आदींची उपस्थिती होती.

याप्रसंगी अनंत मोड यांनी उद्घाटन वर भाषणात बोलताना ते म्हणाले की, क्रिकेट या खेळामुळे अनेक जाती, पंथ, धर्म मिळून हा खेळ खेळला जातो यामुळे देशामध्ये राष्ट्रीय एकात्मतेचे कार्य साधल्या जाते. या मैदानाचा पावित्र्य राखा व या मैदानामुळे जीवनामध्ये संघर्ष करण्याची ऊर्जा निर्माण होते असे ते पुढे म्हणाले. या कार्यक्रमाचे संचालन आयोजक आर्वी विधानसभा संघटक प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे तथा अध्यक्ष सच बोल, सचतोल सामाजिक संस्था नानकसिंग बावरी यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी ते साठी अक्षय बावरी, जगतसिंग बावरी, जगदीश सिंह बावरी, दिलावर सिंह बावरी, तस्वीर सिंह बावरी, राहुल सिंह अंदरले, वीरसिंह बावरी, निखिल सिंह बावरी, जलसिंह बावरी, प्रकाश सिंह जुनी, ललकार आदींनी अथक परिश्रम घेतले

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242